
# कायद्याची ओळख



## कायदा सर्वांसाठी



## कायदेविषयक मदत



## पोलिसांसंबंधीत अधिकार

# आभार

विधी व न्याय विभाग, मंत्रालय भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांनी 'कानुन को जाने' हया हिंदी भाषेत प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकाचे, मराठी भाषेत रुपांतर करुन प्रकाशित करण्याची परवानगी दिलेली आहे. (पत्र क्र. डी.ओ. क्र. AZJ/IEC diseem/01/12 दिनांक १३/०४/२०१२) हयाबद्दल महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई विधी व न्याय मंत्रालय (न्याय विभाग) भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांचे आभार मानीत आहे. तसेच, सदर पुस्तकातील कायदेविषयक माहिती सोप्या भाषेत, तळागाळातील लोकांना समजेल अशा उदाहरणासहीत लिहिलेली आहे ते माननीय लेखक महोदय श्री. संतोष कौशिक, श्री. संजय सिंह राठौर, श्री. विश्वास चव्हाण यांचे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण शतश: ऋणी आहे. त्याचप्रमाणे सदर पुस्तक प्रकाशित करण्याकरीता ज्या ज्या लोकांचा सहभाग मिळाला त्या सर्वांचे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे आभार प्रदर्शित करीत आहोत.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

---

विधी व न्याय विभाग, भारत सरकार तसेच यु.एन.डी.पी. यांच्या सहयोगाने न्याय हे तळागाळातील लोकांकरीता (Access to Justice for marginalised people) या योजनेच्या अंतर्गत लोकांमध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण करणेकरीता विविध कायदेविषयक माहिती असलेली पुस्तके विधी व न्याय विभाग, भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांनी हींदी भाषेत प्रकाशित केली. सदर पुस्तकांचा मराठीत अनुवाद विधी व न्याय विभाग – (पत्र D.O. No. AZJ/IES diseem/01/12 दि. १३ एप्रिल २०१२) यांच्या परवानगीने महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

या पूस्तकाचा मुख्य उद्देश जनतेकरीता कायद्यात असलेल्या तरतूदींविषयी माहिती सोप्या मराठी भाषेत देऊन त्यांना विधी साक्षर करणे असा आहे, त्यामुळे या पुस्तकात समाविष्ट कायद्याबाबत माहितीच्या मजकूराच्या आधारे कायदेशीर प्रकरणासाठी उपयोग करणे अपेक्षित नाही. त्यासाठी मुळ शासकीय अधिनियमांचा व कायद्याच्या पुस्तकाचा उपयोग करावा तसेच या पूस्तकात दिलेली उदाहरणे किंवा गोष्टी या संपूर्णता काल्पनिक आहेत, त्यांचा कुठल्याही व्यक्तीशी अथवा घटनेशी संबंध नाही. हे पुस्तक खाजगी वितरणाकरिता प्रकाशित करण्यात आले.

# अनुक्रमणिका


- कायदा सर्वांसाठी १
  - — कथा — चिमण्या शेत चरुन गेल्या. २
  - — कायदा काय आहे? ६
  - — भारताची राज्य घटना १०
  - — विधी पालिका, कार्यपालिका, न्यायपालिका १२
  - — आपले मौल्यवान अधिकार १५
  - — आपले राजनैतिक अधिकार २०
  - — आपल्या विशेष अधिकारां करिता स्थापित आयोग २३

- कायदेविषयक मदत २६
  - — कथा — आधार २७
  - — कायदेविषयक मदत २९
  - — लोकन्यायालय ३२
  - — मध्यस्थी ३५

- पोलिसांसंबंधी अधिकार ३८
  - — पहिली खबर एफ.आय.आर. ३९
  - — पोलिसांसंबंधीचे अधिकार ४४
  - — न्यायालयात खटल्याची सुनावणी ५०
  - — जामीन ५१
  - — जामीनपात्र गुन्हे व रिमांड ५३
  - — तडजोडयोग्य अपराध व तडजोडीची प्रकरणे ५७
  - — आरोपीची वैद्यकीय तपासणी ६०
  - — मानवी अधिकार आयोग ६१

# कायदा सर्वांसाठी

# १.चिमण्या शेत चरून गेल्या

आमदार दिनानाथ टी.व्ही. वर नजर रोखून एकटेच बसले होते. कुटुंबातील लोकांनाही आत येण्यास मनाई केली होती.

१० वाजले बातम्या सुरु झाल्या. ते फक्त त्यांची बातमी येण्याची वाट पाहत होते.

शेवटी बातमी आली;–

आज विधान सभेत वरणगावचे आमदार दिनानाथ यांनी केलेल्या कथित भ्रष्टाचाराला वाचा फोडण्यात आली. विरोधी पक्षाने या मुद्दयावर जोरात आवाज उठविला. मुख्यमंत्र्यानी चौकशी समिती स्थापन करण्याचे आश्वासन देत सांगितले की त्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सर्व महत्वपूर्ण पदापासुन दूर ठेवण्यात येईल तेंव्हा आरडा ओरडा आणि गोंधळ थांबला.

दिनानाथांनी टी.व्ही. बंद केला. एक लांब श्वास घेत त्यांनी जवळच ठेवलेले एक ग्लास पाणी प्यायले. त्याच वेळी आमदारांची पत्नी शकुंतला म्हणत आली, "आता समजलं एकटे का बसले आहात? बाजुच्या खोलीत सर्व कुटुंब देखील टी.व्ही. पाहात आहे."



दीनानाथ काहीच बोलले नाहीत.

शकुंतला खूप अस्वस्थ झाली होती.

जवळ बसत ती म्हणाली– "हे चांगलं झालं नाही. भागातील लोक आधीच नाराज आहेत. मंत्रिमंडळात प्रतिमा खराब झाली ते वेगळंच."

दीनानाथ मौन सोडत म्हणाले "चला आता काही दिवस गावाकडे जाऊ या."

"गावाकडे तीन वर्षात तीनदाच गेला आहात. कसे सामोरे जाल सर्वांना?"

"आता निवडणुकीला एक वर्ष राहिले आहे. शेवटी परतुन गावाकडेच जावे लागणार आहे. आपले घर आहे, कुटुंब आहे, शेती आहे, आपले अन्न–पाणी आहे."

शकुंतलाला राहवले नाही. ती म्हणाली– " हे का विसरता की लोकांनी तुम्हाला निवडुन पाठविले होते. कशासाठी तर त्यांच्या सुखदुखा:ची लढाई तुम्हाला लढता यावी, त्यांच्या गरजांकडे लक्ष देता येईल, त्यांचा आवाज विधान सभेपर्यंत पोचवाल. आता काय उत्तर देणार त्यांना?"

"गावकरी तर नंतर विचारतील अगोदर तू माझा जीव घे." दिनानाथ चिडून म्हणाले, "ठिक आहे जे होईल त्याला सामोरे जाऊ."

दिनानाथ यांच्या भ्रष्टाचाराची बातमी लगेच त्यांच्या विधानसभा विभागात पसरली.



जागोजागी लोक एकत्र बसून त्यांचीच चर्चा करीत होते. मागील दहा दिवसांपासून जागो–जागी विभागातील प्रत्येक गटामध्ये जोरदार वादविवाद चालू होते. परंतु, इमलीपुर गावातील चावडीवर बसलेले लोक जास्तच अस्वस्थ होते. कारण ते दिनानाथ यांचे स्वत:चे गाव होते. लोक मोठमोठ्या आवाजात बोलत होते. संभाषण काहीसे या प्रकारचे होते –

"दीनानाथने तर गावचे नाकच कापले."

" निवडून तर तुम्हीच पाठविले होते "

" काय करावे? दही समजून फसलो आणि कापूस खाल्ला."

" आमदार निधी (फंड) मधून विभागात दोन रुपयाचे देखील काम करुन घेतले नाही."

" जे काही थोडे फार काम झाले आहे तेही पंचायती कडून झाले आहे."

" भाऊंना स्वत:चे पोट भरण्यापासून सवड मिळेल तेंव्हा ना?"

" आम्हाला तर अगोदरच शंका होती. आम्ही त्यांना मतच दिले नव्हते."

"मंत्री झाल्याबरोबर गावाकडचा रस्ताच विसरले. चार वर्षात चारदाच गावाकडे आले आहेत."

दिनानाथ यांना मत देणारे आपल्या निर्णयावर पश्चाताप करीत होते. ज्यांनी मत दिले नव्हते ते खिल्ली उडवित होते. चावडीवर एक जोरदार वादविवाद चालू होता.

तेंव्हाच गावात एक टाटा सुमो गाडी आली. सर्व लोक उत्सुकतेने गाडीकडे बघू लागले. गाडीचा दरवाजा उघडताच दिनानाथ आपल्या कुटुंबासह उतरले. सर्व लोक उभे राहिले. सर्वांनी आमदारांना नमस्कार केला. लोकांच्या वागण्यातील बदल स्पष्टपणे दिसत होता. पूर्वीसारखे गावातील लोक धावत गाडीकडे आले नाहीत. काही लोकांनी पुढे होऊन सामान उचलून दिनानाथ यांच्या घरापर्यंत पोहचविले.

दोनचार दिवसातच दिनानाथ यांना कळून चुकले की, आता वाऱ्याची दिशा बदलली आहे.

दिनानाथ यांची परिस्थिती आणखीनच अवघड झाली होती. लोकांमध्ये नाराजी आणि मनातील अंतर वाढू लागले.

लोकांच्या रोषाचा अंदाज तेंव्हा आला जेंव्हा दिनानाथ यांना गहु कापण्यासाठी गावातून मजूर मिळाले नाहीत. गहु कापण्याचे यंत्र बोलावून गहु कापण्यात आले.

दिनानाथ यांच्या मोठ्या मुलीचे लग्नसंबंध मोडले तेव्हा त्यांना आणखी मोठा धक्का बसला. मुलाच्या वडिलांनी स्पष्ट सांगितले की, "आम्हाला नाही व्हायचे एका भ्रष्ट नेत्याचे व्याही."

दिनानाथ यांचा सगळा डाव उलटला होता कारण आता परिस्थिती पूर्णपणे बदलली होती.

आठ महिन्यानंतर निवडणूक येणार होती. लोकांमध्ये कुजबुज व्हायला लागली होती. इमलीपूरच्या माध्यमिक शाळेचे शिक्षक ताराचंद हे सर्व गावाला आवडत होते. गावात होणाऱ्या प्रत्येक बैठकीतील चर्चेमध्ये मास्तर केंद्रबिंदू राहायचे. लोक त्यांचे म्हणणे मान्य करीत असत.

दिनानाथ यांनी पुन्हा एक डाव खेळण्याचा प्रयत्न केला. ताराचंद मास्तरांना घरुन बोलाविले. खुप आदराने त्यांच्या चहापाण्याची व्यवस्था केली आणि बोलता बोलता हळूच मुद्दयाच्या गोष्टीवर आले.

"काय गुरुजी गावाचा रोख कसा आहे?" दिनानाथ यांनी विचारले.

"सर्वजण नाकावर राग घेवून बसलेले आहेत." ताराचंद बोलले.

"का?" जर भ्रष्टाचाराचे खोटे आरोप माझ्यावर लावून मला फसविण्यात आलेले आहे, तर त्याची शिक्षाही मीच भोगेन. गावकरी माझ्यावर का नाराज आहेत?

"गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, आपण मंत्री झाल्यावर त्यांची कोणतीही मदत केली नाही. गावातील माध्यमिक शाळेला इंटरपर्यंत करण्याचे आश्वासन, गावाला शहराशी पक्क्या रस्त्याने जोडणे, प्राथमिक आरोग्य केंद्र यापैकी कोणतेच काम पूर्ण केले नाही. कोठपर्यंत मोजदाद करु, आमदार साहेब वाटल्यास आपण स्वत: लोकांशी बोलावं."

दिनानाथ तणतणले. आमदार असल्याचा गर्व अजून गेला नव्हता.

चर्चेचा कोणताही निष्कर्ष निघाला नाही. मास्तर उठून निघून गेले.

दिनानाथ यांच्या विधानसभा विभागात नवीन उमेदवारांमध्ये ताराचंद मास्तरांचेही नाव होते.

एक दिवस जवळच्या गावातून बोलविणे आले. तेथे चार ग्रामपंचायतीचे लोक मिळून ताराचंद मास्तरांना तिकीट मिळवून देण्याकरीता बैठक घेत होते.

ताराचंद अत्यंत ईमानदार आणि भला मनुष्य होता. बैठक सुरु झाली तेव्हा सर्वांनी ताराचंदला पुढील निवडणूकीत उभे करण्याबद्दल म्हणणे मांडले. परंतु, ताराचंदने हात वर केले.



ताराचंदने अत्यंत नम्रतेने बोलणे सुरु केले–

"बंधुंनो, मी आपल्या भावनांचा आदर करतो. परंतु, या महासंग्रामात मी उडी घेवू इच्छित नाही. मला आपल्या लोकांसाठी जे काही करायचे आहे ते मी

निवडणूक न लढविता देखील करु शकतो. आज एका विशिष्ट गोष्टीत मी आपल्याला सहभागी करु इच्छितो. ती अशी की आपल्या हातामध्ये सर्वांत मोठे शस्त्र आहे. आपल्या या मतदानानेच सरकार निवडले जाते."

आपण मिळून असा एक उमेदवार निवडू जो आपल्या हक्कांची लढाई लढेल, आपल्या गावाच्या हिताचे आणि विकासाचे कार्य करेल. आपले पूर्वीचे अनुभव फार चांगले नाहीत. मी नाव घेवू इच्छित नाही. लोकांच्या अपेक्षा ज्याप्रमाणे धुळीत मिळविण्यात आल्या ते चुकीचे आहे.

या बैठकीमध्ये दिनानाथ यांचेही एखाद–दोन लोक बसलेले होते. त्यांच्यापैकी एक जण म्हणाला– "दुसऱ्यांवर चिखल उडवित आहात तर निवडणुकीत उभे रहायला का घाबरत आहात?"

"मी घाबरत नाही– माझी लाल दिव्याच्या गाडीतुन फिरायची इच्छा देखील नाही. माझी मनातून अशी इच्छा आहे की मी आपल्या गावातच राहून आपली पंचायत सक्षम करावी. बंधु आम्ही हायवेवाले नाहीत, आम्ही तर पाऊलवाटवाले आहोत. माझे फक्त हेच म्हणणे आहे की, कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता शंभर टक्के मतदान करावे. आपल्या मताचे मूल्य ओळखावे. आपल्या मताची ताकद ओळखावी."–एवढे बोलून ताराचंद बसले.

वरणगाव भाग आजही आपली परिस्थिती सुधारण्याची वाट बघत आहे. किती टोप्या बदलल्या, किती नेते बदलले, किती खुर्च्या बदलल्या, वरणगावच्या पाऊलवाटांवर न जाणो किती पायांची चिन्हे आहेत. परंतु, ते आजही अशा एका लोकनायकाची वाट पहात आहेत, ज्याच्या मनामध्ये माणसांच्या सुधारणेचे स्वप्न असेल, वरणगावच्या विकासाचे स्वप्न असेल.

ही एक लहानशी कथा होती जी आपल्याला आपल्या राजनैतिक अधिकारांच्याबद्दल जागरुक करते. देशातील प्रत्येक नागरिकाला मतदान करण्याचा हक्क आहेच परंतु, इच्छा असल्यास तो स्वत: देखील निवडणूक लढवू शकतो. निवडणूकीत मतदान करुन पाच वर्षापर्यंत आपल्या लोकप्रतिनिधींना बघत बसून जमत नाही. आपण आपले अधिकार, कायदे, आपली राज्यघटना व आपली न्यायपालिका जाणून घ्या.

<u>या आपल्या कायद्यांची महत्वपूर्ण माहिती समजुन घेवु.</u>



# २. कायदा काय आहे



आपण पेरलेल्या लोकशाहीच्या बियाण्यापासून उगवलेले वृक्ष म्हणजे कायदा. ज्यांच्या फांद्या कर्तव्य आहेत. ज्यांची पाने अधिकार आहेत ज्यांवर उपाय आणि सुविधांची फळे लागलेली आहेत. ज्यांची सावली सुरक्षा आणि समानता आहे. ज्यांना कापल्यावर/तोडल्यावर शिक्षा व दंड मिळतो. म्हणून त्यांची माहिती आवश्यक आहे. राज्यघटना एका झाडाच्या मूळांसारखी आहे आणि कायदे त्या झाडाच्या फांद्यांप्रमाणे आहेत.

कायदा काय आहे आणि आपण तो जाणून/माहिती करुन घेणे का आवश्यक आहे?

- आपण सगळे गप्पांमध्ये वकील, कोर्ट, कचेरी, तहसील, ऑफिस, विभाग, प्रमाणपत्र, नोंदणी, अधिकार, सरकार, मंत्री, आमदार, पंचायत, सरपंच, अंगणवाडी, रोजगार हमी, दारिद्र्य रेषा कार्ड सारखे शब्द बोलतो, ऐकतो अथवा वाचतो. या सर्वांचे कार्य ज्या नियम आदेशानुसार चालते त्यांनाच "कायदे" म्हणतात.
- कायद्यासमोर देशातील प्रत्येक नागरिक समान आहे. कोणीही कायद्यापेक्षा वर नाही आणि कायदा सर्वांचे सारख्याच प्रकारे रक्षण करतो.
- आपल्या दिनचर्येशी निगडीत सर्व कामे कोणत्यातरी नियम अथवा "कायद्याच्या" आधारावरच चालतात. जर आपल्याला कायद्यांची माहिती असेल तर कोणीही आपल्याला विनाकारण त्रास देऊ शकणार नाही आणि जे आपले आहे ते कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही.

कायदे कोण बनवितात आणि कसे बनवितात ?

- आमदार आणि खासदारांना तुम्ही निवडून देता.
- आमदार विधानसभेत आपल्या राज्यासाठीचे कायदे बनवितात. खासदार दिल्लीतील संसदेत जाऊन पुर्ण देशाकरिता कायदे बनवितात.
- हे कायदे देशाच्या स्वातंत्र्यापासुन मागील जवळपास ६५ वर्षांपासुन तयार होत आले आहेत.
- सर्वात मोठा कायदा आपली राज्यघटना आहे.

कायदे दोन प्रकारचे असतात.:—

कायद्याचे प्रकार

| सार्वजनिक कायदे (सर्व माणसांसाठी) | व्यक्तिगत कायदे (एखाद्या माणसासाठी) |
| --- | --- |
| मनुष्य आणि सरकार यांचे दरम्यानच्या व्यवहारांना लागू होणारे कायदे | लोकांचे दरम्यानच्या व्यवहारांना लागू होणारे कायदे |
| घटनात्मक कायदे आणि फौजदारी कायदे | विवाह, संपत्तिक/जमीन मालमत्ता अथवा दिवाणी कायदे |
| घटनात्मक कायदे आणि फौजदारी कायद्यांचे म्हणणे ऐकले नाही तर अथवा गुन्हा केल्यावर लागू होणारे कायदे | दिवाणी कायद्यानुसार जमीन, मालमत्ता, विवाह इत्यादी वादांचे परिस्थितीत लागू होणारे कायदे |

संस्कृती आणि शिक्षणाचा अधिकार:—

- मद्रास राज्यातील इंजिनियरिंग आणि मेडीकल कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रत्येक समाजाच्या लोकांसाठी निश्चित टक्केवारी ठरविलेली आहे. एका ब्राम्हण विद्यार्थ्याला त्याच्या जातीच्या आधारावर कॉलेजमध्ये प्रवेश नाकारण्यात आला.
- याला सांप्रदायिक आदेश समजून याबाबतीत सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रकरण दाखल करण्यात आले. या प्रकरणात सांगण्यात आले की धर्म आणि जातीच्या आधारावर लोकांना कॉलेजमध्ये प्रवेश देण्याचा कोणताही अधिकार नाही आणि कॉलेजमध्ये असे केल्यास संस्कृती आणि शिक्षणाच्या अधिकारांचे ते उल्लंघन होईल. सर्वोच्च न्यायालयाने देखील अशा प्रकारची व्यवस्था घटनाविरोधी ठरविली आणि कॉलेजाचे जातींवर आधारीत प्रवेश देण्याचे धोरण रद्द केले.

कायद्यांच्या नजरेतुन समानता:—

- रमेश एक रोजंदारीने कमावणारा आहे जो एका झोपडपट्टीमध्ये राहतो. कमलेश एका आलीशान कॉलनीमध्ये राहतो आणि एका चांगल्या कंपनीत काम करतो. एके दिवशी रमेशचे आपल्या मित्राशी भांडण झाले. त्यामध्ये त्याचा मित्र गंभीररित्या जखमी झाला. कमलेशचे देखील त्याच्या मित्राशी भांडण झाले त्यानेही त्याच्या मित्राला गंभीर जखमी केले होते. कायद्यानुसार रमेशला गरीब असल्यामुळे आणि कमलेशला धनाढ्य

असण्याच्या आधारे सोडून दिले जाणार नाही.

- कायद्याच्या दृष्टीमध्ये रमेश आणि कमलेश दोघेही समान आहेत. गुन्हा सिद्ध झाल्यावर दोघांनाही दंड केला जाईल.

कायद्याद्वारे समान संरक्षण:—

- या अधिकाराचा अर्थ असा आहे की, शासनाद्वारे/सरकारद्वारे लोकांबद्दल भेदभाव केला जाणार नाही. कोणाकडूनही धर्म, मूळवंश, जात, लिंग अथवा जन्म ठिकाणांच्या आधारावर अंतर अथवा जात इत्यादिंचे आधारे कोणामध्ये पक्षपात केला जाऊ शकत नाही.

- सखाराम तीन पिढ्यांपासून पादत्राणे तयार करण्याचे काम करीत आहे. म्हणून त्याचे नांव अनुसूचित जातींच्या यादीमध्ये आहे. सखारामचे कुटुंब समाजासोबत चालू शकत नाही आणि मागास राहिले. याच मागासलेपणामुळे आता सरकार सखारामसारख्या अनुसूचित जातीतील कुटुंबांना समाजासोबत खांद्याला खांदा लावून चालण्यासाठी देखील अनेक तऱ्हेने मदत करीत आहे. अशा तऱ्हेने समाजातील दुर्बल लोकांची मदत करणे हा पक्षपात नाही. परंतु, त्यास राज्य घटनेनुसार सर्वांबद्दल समान वागणूक दिली असेच म्हटले जाईल.

समान संधी:—



- रमाशंकर नगर पालिकेतील शाळेत शिक्षक होता. जेंव्हा त्याला सरकारी नोकरी मिळाली तेंव्हा त्याला एक आदेश देण्यात आला होता की त्याने स्वत:चे पूर्वीचे जीवन आणि डॉक्टरांपासून तपासणीबाबत शपथपत्र दाखल करावे. रमाशंकरना १९७४ मध्ये नोकरीवरुन काढून टाकण्यात आले होते. पोलीस अधीक्षकांच्या अहवालावरुन त्यास नोकरीवरुन काढून टाकण्यात आले होते. अहवालामध्ये नमूद करण्यात आलेले होते की, रमाशंकर सरकारी नोकरीसाठी योग्य नाही कारण, पूर्वी तो राजकीय संघटनेमध्ये काम करीत असतांना त्याचा राजकीय हालचालींमध्ये सहभाग घेत होता.


- लोक सेवांसाठी राजकीय हालचाली आणि दबावाच्या मदतीने सरकारी नोकरी प्राप्त करणे म्हणजे संधीच्या समानतेच्या अधिकारांचे उल्लघंन आहे. ज्यामध्ये अनुच्छेद १४ आणि १६ द्वारे निर्देशित मौल्यवान अधिकारांचे हनन आहे. फौजदारी कायदे सर्व धर्मांसाठी एक सारखे असतात. परंतु, दिवाणी कायद्यामधील विवाह, वारसा, घटस्फोटाचे कायदे, हिंन्दु, मुस्लीम व ख्रिस्तांसाठी वेगवेगळे असतात.

मोफत कायदेविषयक सहाय्य:–

- गरीब, असहाय्य अथवा पिडीत असल्यामुळे कोर्ट/कचेरी मधील खर्च, जसे की कोर्ट फी, टंकलेखन खर्च, साक्षीदारांचा खर्च, नक्कल मिळविण्याचा खर्च, इंग्रजीतून मराठी मध्ये भाषांतर करण्याचा खर्च, कोर्टाचे आदेश अथवा इतर कागदपत्रांच्या सत्यप्रति (फोटोकॉपी) हा खर्च जर कोणाला उचलणे शक्य नसेल तर तेथे विधी सेवा प्राधिकरण (L.S.A) आपली मोफत मदत करते.

विधी सेवा प्राधिकरणानुसार जर कोणी व्यक्ति

- अनुसूचित जाति(हरिजन) अथवा अनुसूचित जमाती(आदिवासी) समाजातील आहे.
- लोकांच्या गैरवर्तनाने पिडीत आहे आणि त्यास मजुरी दिल्याविना काम करावयास लावले जात आहे.
- महिला किंवा बालक आहे.



- मानसिक दृष्टया आजारी अथवा अयोग्य आहे. जसे की,–
- ❖ अंध आहे अथवा दृष्टी दुर्बल आहे, कुष्ठरोगी आहे, कमी ऐकू येणारा आहे, चालता फिरता येत नाही किंवा मानसिक दृष्टया आजारी आहे.
- ❖ जातीय हिंसा अथवा अत्याचाराने त्रस्त आहे अथवा भूकंप, पूर, दुष्काळ इत्यादिने पीडीत आहे.
- ❖ कारखान्यात अथवा कंपनीमध्ये मजूर आहे अथवा तुरुंगात बंदी आहे.
- वार्षिक उत्पन्न रु.५०,०००/–पेक्षा जास्त नसेल तर त्याचा कोर्ट कचेरीचा सर्व खर्च सरकार उचलेल आणि मोफत वकील उपलब्ध करुन देईल.
- हे मोफत कायदेविषयक सहाय्य तहसीलदार, एसडीपीओ, कलेक्टर, आयुक्त, तहसील न्यायालय, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयातून मिळते.
- जेथपर्यंत शक्य असेल तेथपर्यंत चर्चेतुन वादाचे निवारण शोधले पाहीजे.
- आपले हित लक्षात ठेवून लोकअदालतच्या माध्यमातून आपापसातील वाद तडजोडीने संपविले जाऊ शकतात.



# ४.भारताची राज्य घटना

- १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी देशातील लोकांनी निवडणूक घेऊन एक समिती तयार केली. त्या समितीला घटना सभा असे संबोधण्यात आले. घटना सभेने २६ जानेवारी १९४९ रोजी देशाची राज्यघटना तयार केली जी २६ जानेवारी १९५० ला लागू करण्यात आली.
- राज्य घटना देशाचा सर्वात मोठा कायदा आहे. इतर सर्व कायदे तिच्याच आधारे तयार होतात.

> राज्यघटनेत सर्व लोकांना मौल्यवान/मुलभूत अधिकारांबद्दल सांगण्यात आलेले आहे. राज्य घटनेला देशातील जनतेकडून सर्व शक्ती/बळ मिळते.




राज्यघटनेची प्रस्तावना :—

आम्ही, भारताचे नागरिक, भारताला एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य बनविण्यासाठी तसेच याच्या समस्त नागरिकांना:—

सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ति, विश्वास, धर्म आणि उपासनेचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि संधीची समानता प्राप्त करण्यासाठी तसेच त्यासर्व व्यक्तिंचा सन्मान आणि राष्ट्राची एकता आणि अखंडता निश्चित करणारी बंधुता वाढविण्याचा दृढनिश्चय करुन आमच्या या घटना सभेमध्ये आज दिनांक २६ जानेवारी १९४९ या द्वारे अंगभूत अधिनियमाला आर्पित करीत आहोत.

सोप्या शब्दांमध्ये प्रस्तावनेचा अर्थ या प्रकारचा आहे.—

- भारताचे लोक — यामध्ये आपण सर्व भारतीय येतो.
- सार्वभौम — म्हणजेच भारत आता कोणाचाही गुलाम नाही.
- समाजवादी धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य— सर्वांना समान अधिकार आहेत

म्हणजेच समाजवादी सर्व धर्मांचा आदर ज्यामध्ये कोणत्याही धर्माला विशेष सुट नाही. सर्व धर्म समान म्हणजेच धर्मनिरपेक्ष जनतेचा जनतेसाठी जनतेद्वारे सरकार चालविणे देखील समाविष्ट आहे. हीच लोकशाही आहे.

- तीन न्याय – आर्थिक, सामाजिक आणि राजनैतिक.
- चार स्वतंत्रता – विचार, अभिव्यक्ति, धर्म व उपासना
- दोन समानता – प्रतिष्ठा आणि संधी
- या सर्वांमुळे सर्व व्यक्तिंचा सन्मान आणि आपल्या देशाला एक ठेवणाऱ्या बंधुभाव वाढविण्याचा दृढनिश्चय करुन राज्यघटना स्विकृत आणि लागू करीत आहोत.
- उपरोक्त सर्व बाबींमध्ये आपल्या देशामध्ये राज्यघटनेची मुळभावना आहे. त्या अंतर्गत आपल्या देशातील सर्व कामकाज होतात.
- या सर्व बाबींचे कोणीही उल्लंघन करु शकत नाही.
- उपरोक्त न्याय, स्वतंत्रता व समानता या देशातील सर्व लोंकासोबत एकाचवेळी एक समान मिळालेले आहेत. याच आधारावर विधी पालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका कार्य करतात.



# ४. विधी मंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका



आता आम्ही हे जाणले आहे की, आपले कायदे काय आहेत? त्यांचे काय महत्व आहे? कायदे कोण तयार करतो? आणि पालन झाले नाही तर कशा प्रकारे न्याय दिला जातो.

- हे कार्य विधीमंडळ, कार्यपालिका व न्यायपालिका करतात. यामध्ये दोन भाग आहेत.:–

विधी मंडळ

संसद — विधानसभा

विधीमंडळ

- विधीमंडळात ज्या पक्षाचे जास्त खासदार अथवा आमदार निवडणूक जिंकून येतात त्यांचे खासदार किंवा आमदार सरकार चालवितात. त्याच पक्षाचे पंतप्रधान, मुख्यमंत्री अथवा मंत्री बनतात.
- हे लोकही विधीमंडळात मान्यता प्राप्त आहेत.
- संसदेचे तीन अंग असतात – लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती.

राष्ट्रपती

लोकसभा — राज्यसभा

- विधानसभेचे अंग असतात राज्यपाल व विधान सभा, देशातील काही राज्यांमध्ये विधान परिषदेचेही प्रयोजन आहे.

- विधीमंडळ – कायदे बनविते.

<u>केंद्र शासनाद्वारे कायदा कसा तयार केला जातो.</u>

केंद्र शासनाद्वारे विधेयकाचा मसुदा तयार करणे

संसदेत विधेयक सादर करणे

| | |
|---|---|
| लोकसभा (कनिष्ठ सभागृह) | राज्यसभा (वरिष्ठ सभागृह) |

↓

दोन्ही सभागृहात विधेयकावर चर्चा

↓

दोन्ही सभागृहात विधेयक पारित होणे

↓

विधेयक राष्ट्रपतींच्या अनुमतीसाठी पाठविणे

↓

विधेयकाचे रुपांतर अधिनियमात होणे आणि भारत सरकार द्वारे राजपत्रामध्ये प्रकाशित होणे

↓

त्यानंतर हा कायदा पूर्ण देशभर लागू होतो.

- <u>कार्यपालिका</u> – विधीमंडळाद्वारे केलेले कायदे लागू करते.
- <u>न्यायपालिका</u> – त्यांचेवर लक्ष ठेवते. त्यातील अधिकारांचे उल्लंघन झाल्यावर कार्यवाही करते.
- कार्यपालिकेत विधानसभा अथवा संसदेतील मंत्रीमंडळ समाविष्ट असते. आयुक्त, जिल्हाधिकारी, एसडीओ, तहसीलदार, पटवारी सर्वजण कार्यपालिकेमध्ये असतात. कार्यपालिका, विधीमंडळाला उत्तरदायी असते. जनतेच्या हिताकरीता संसदेत किंवा विधानसभेत आमदार, खासदार, मंत्रीमंडळातील सदस्याला जनतेतर्फे प्रश्न विचारतात. त्याचे उत्तर कार्यपालिकेला दयावे लागते.

## राज्य शासनाद्वारे कायदा कसा तयार केला जातो

राज्य शासनाद्वारे विधानसभेत विधेयक सादर करणे

विधानसभा → विधानपरिषद

सभेद्वारे विधेयकावर चर्चा

↓

सभेद्वारे विधेयक पारित होणे

↓

विधेयक राज्यपालांच्या अनुमतीसाठी पाठविणे

↓

विधेयकाचे रुपांतर अधिनियमात होणे आणि राज्य सरकार द्वारे राजपत्रामध्ये प्रकाशित होणे

↓

त्यानंतर हा कायदा पूर्ण राज्यात लागू होतो.

- विधीमंडळ जनतेप्रति उत्तरदायी असते कारण ते जनतेच्या मतांनी बनते.
- विधीमंडळ व कार्यपालिका जर राज्य घटनेनुसार काम करीत नसतील तर न्यायालय त्यांचेवर लगाम घालते ज्यांचा निर्णय मान्य करावा लागतो.
- जर कोणाही व्यक्तीला विधीमंडळाद्वारे बनविलेले कायदे किंवा न्यायपालिकेद्वारा कायदयाचे पालन न केल्यामुळे त्रास झाला किंवा अडचण आली तर तो न्यायालयात प्रकरण दाखल करुन न्याय मिळवू शकतो.

# आपले मौल्यवान अधिकार

- भारतीय राज्यघटने अंतर्गत विधीमंडळ, कार्यपालीका व न्यायपालिका आपल्या मौल्यवान अधिकारांचे रक्षण करण्यास वचनबध्द आहेत.

संसद/विधानसभा कोणतेही कायदे बनवू शकते काय?

- आपल्याला आपल्या मौल्यवान अधिकारांची माहिती होणे फार आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या मानसन्मानाचे रक्षण होते.
- मौल्यवान अधिकारांमुळे व्यक्तिचे केवळ शारिरीक व मानसिक संरक्षण व विकास होतो असे नव्हे तर समाज आणि राष्ट्रामध्ये देखील त्यांना एक स्थान प्राप्त होते.
- मूलभूत अधिकारांशिवाय कोणत्याच व्यक्तिचा योग्य रितीने विकास होऊ शकत नाही.
- मूलभूत अधिकार कोणा एका व्यक्तिचे नाहीत तर ते सार्वजनिक धोरणानुसार सर्व समाजाची सुरक्षा, हित आणि कल्याणासाठी बनविलेले आहेत.
- भारत एक लोक कल्याणकारी देश आहे आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे सर्वात पहिले कार्य आहे.
- न्यायालयांचेही जागरुक पहारेक-यांप्रमाणे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्याचे काम आहे.

शोषणांचे विरोधात बालअधिकार:-

एम.सी.मेहता विरुध्द तामिळनाडू राज्य व इतर या प्रकरणात बालशोषणा विरुध्द सर्वोच्च न्यायालयाकडून एक महत्वपुर्ण निर्णय आला: १९९८ (6) SCC 756.

१० डिसेंबर १९९६ ला सर्वोच्च न्यायालयाकडून निम्नलिखीत निर्देश देण्यात आले:-

- बालमजूरी करावयास लावणाऱ्या आरोपी मालकाला बालमजूरी करणाऱ्या बालकास नुकसान भरपाई स्वरुपात रु. २०,०००/- द्यावे लागतील. (Prohibition and Regulation Act, 1986)
- प्रोहिबिशन ॲण्ड रेग्युलेशन ॲक्ट,१९८६ नुसार नेमण्यात आलेले निरीक्षकांच्या निगराणीखाली ही रक्कम "बालमजुरी पुनर्वसन-तथा-कल्याण निधी" मध्ये जमा केली जाईल.
- ज्या कुटुंबातील बालक एक कारखान्यात किंवा खदानीत अथवा धोकादायक स्थळी काम करीत आहे त्या कुटुंबातील प्रौढ सदस्याला शासनाद्वारे नेमणूक दिली जाईल.
- कुटुंबातील सदस्याला त्याच कारखान्यात नेमणूक देण्यात येईल ज्यामध्ये बालक काम करीत आहे.
- जर शासनाद्वारे नेमणूक देण्यात आली नाही तर शासनाला जेथे बालकांना कारखान्यात किंवा खदानीत अथवा इतर धोकादायक कामास लावलेले आहे तेथे प्रति बालक

रु. ५०००/– या हिशोबाने "बालमजुरी पुनर्वसन–तथा–कल्याण निधी" मध्ये जमा करावे लागतील.

- पालकांची ही जबाबदारी राहील की बालकाला पुन्हा त्या ठिकाणी कामावर पाठवायचे नाही कारण त्यांच्या उत्पन्नाची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे.
- ज्या परिस्थितीमध्ये पर्यायी नेमणूक देता आली नसेल त्या संबंधित बालकाच्या पालकांना बालक कमावित होता तितके उत्पन्न देण्याची व्यवस्था करण्यात येईल.
- जर बालकाला शिक्षणासाठी पाठविण्यात येत नसेल तर नेमणूक आणि मिळणारी रक्कम थांबविण्यात येईल.
- बालमजूरीचे काम थांबविल्यावर बालक चांगल्या संस्थेमध्ये शिक्षण घेत आहे किंवा नाही यावर निगराणी ठेवण्याची जबाबवदारी निरीक्षकांवर आहे. राज्य घटनेनुसार शिक्षण हेच बालकांना चांगला नागरिक बनविण्यामध्ये मदत करते.
- ज्या कामामध्ये धोका नाही अशा कामांचे बाबतीत निरीक्षक देखरेख ठेवेल की,
    - बालकाचे कामकाजाचे तास ४ अथवा ६ पेक्षा जास्त नाहीत.
    - बालक दररोज दोन तास शिक्षण घेत आहे.
    - शिक्षणावर येणारा पूर्ण खर्च नियोक्ता/ मालकाकडून केला जाईल.

समानतेचा अधिकार (कलम १४)

- जन्माने कोणतीही व्यक्ति लहान अथवा मोठी होत नाही. कायदयासमोर सर्व जण सारखेच आहेत.
- लहान–मोठे, उच्च–नीच, सबळ–दुर्बल, श्रीमंत–गरीब, स्त्री–पुरुष आणि जातीय भेदभावास कोणतीही जागा नाही.(अनुच्छेद १५/कलम १५)
- माणसा–माणसामध्ये फरक नाही, धर्म, मूळ, देश, जन्मठिकाण, जात, भाषा, लिंग यांचे आधारावर भेदभाव केला जाणार नाही.
- सर्व लोकांना समान रितीने दुकान, सार्वजनिक भोजनालय, मनोरंजनाचे ठिकाण, विहीरी, तलाव, स्नानगृह, रस्ता इत्यादिंच्या उपयोगाची बरोबरी विना भेदभाव समान संधी उपलब्ध आहे. (अनुच्छेद १६/कलम १६)



स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९)

- डॉ.अण्णा एका संस्थेचे जनरल सेक्रेटरी आहेत. एक दिवस शासनाने कालव्याद्वारे सिंचनाचे दर वाढविले. डॉ.राम यांनी त्या विरोधात मोहीम सुरु केली. त्यांचे म्हणणे असे होते की, शेतकऱ्यांवर या दरवाढीमुळे अनावश्यक अतिरिक्त भार पडेल.

प्रश्न : डॉ.राम यांनी याप्रकारे विरोध करणे कायद्याने न्यायसंगत आहे काय?

उत्तर : होय. कारण, लोकांचा मौलिक अधिकार आहे.

घटना एक:—

रजिया बांगला देशातून आली. ती अजमेर शरिफला जाण्यासाठी स्टेशनवर पोहोचली. तिच्याजवळ प्रतिक्षा (वेटिंग) रेल्वे तिकीट होते. खात्री करणेसाठी ती तिकीट निरीक्षकाकडे गेली. तिकीट निरीक्षकाने तिला महिला प्रतिक्षालया मध्ये थांबण्यास सांगितले. ती तेथे गेली.दुपारनंतर ३ वाजण्याच्या सुमारास तिच्या जवळ अशोक व सतबीर नावाचे दोन युवक आले. त्यांनी रजियाकडून तिच्या जवळील तिकीट घेतले आणि आरक्षण (रिझर्वेशन) कन्फर्म करुन तिकीट परत केले. रात्री आठ वाजता सतबीर, काशी नावाच्या एका मुलासोबत पुन्हा आला आणि रजियाला जेवण करावयाचे असल्यास बाजूच्या रेस्टॉरंटमध्ये जेऊ शकते असे सांगितले. रजिया त्याच्या सोबत जेवण करण्यासाठी गेली. परंतु, जेवणानंतर तिला उलटी झाली. ती पुन्हा स्टेशनमधील विश्रामगृहात गेली. काही वेळाने अशोक, रफी आणि पार्सल सुपरवायझर तेथे आले आणि रजियाला यात्री निवासात जाण्याचा सल्ला देऊ लागले. वेटिंगरुमच्या महिला अटेंडने देखील रजियाला यात्री निवासात जाण्याचा सल्ला दिला. रजिया सामान घेऊन त्या लोकांसोबत यात्री निवासाकडे निघाली. रस्त्यामध्ये सिताराम आणि एक विद्युत कर्मचारी त्यांच्या सोबत आले. तिला यात्री निवासातील खोलीत नेण्यात आले. ती खोली अशोकच्या नावावर बुक केलेली होती. तेथे रजियाला फसवून त्या चौघांनी तिच्यावर बलात्कार केला. कशीबशी ती त्या खोलीतून पळाली आणि स्टेशनवर पोहोचल्यावर सतबीरला भेटली. सतबीरने खोटी सहानुभूती दाखविन "तू घरी चल, गाडी येईपर्यंत माझ्या बायको मुलांसोबत रहा" असे म्हटले. रजियाची ट्रेन दुसऱ्या दिवशी होती. तिने सतबीरवर विश्वास ठेवला आणि त्याच्या सोबत निघाली. रस्त्यामध्ये सतबीरचा एक मित्र समीर देखील सोबत आला. सतबीर रजियाला त्याच्या एका मित्राच्या फ्लॅटवर घेऊन गेला तिथे दोघांनी रजियावर बलात्कार केला. रजियाचा आरडाओरड ऐकून घरमालकाने पोलिसांना कळविले. रजियाला पोलीस सोबत घेऊन गेले.

प्रश्न : रजियाला या घटनेमध्ये नुकसान भरपाई मिळण्याचा अधिकार आहे काय? ती भारतीय नागरिक नसली तरीही?

उत्तर : होय. रजिया परदेशी असली तरीही नुकसान भरपाई मिळण्याचा तिला अधिकार आहे. रजिया सामुहिक बलात्काराची बळी ठरली. राज्यघटनेच्या अनुच्छेद २१/ कलम २१

नुसार रजियाच्या मौलिक अधिकारांचे हनन झाले.

देशातील सर्व नागरिकांना मौलिक अधिकार प्राप्त आहेत.रजिया वास्तविकत: भारतीय नागरिक नव्हती. ती भारतात एक बांगलादेशी नागरिक म्हणून आलेली होती. परंतु, भारतीय राज्य घटनेतील अधिकारांनुसार रजियाला देखील "जीवनाचा अधिकार/जगण्याचा अधिकार" या अंतर्गत न्याय मिळविण्याचा अधिकार आहे. कारण, रजिया सोबत शारिरिक हिंसा झाली ज्यामुळे तिच्या अब्रुवर हल्ला झाला. त्यामुळे अनुच्छेद २१ नुसार रजियाला नुकसान भरपाई मिळविण्याचा अधिकार आहे.

घटना दोन:–

राधा एक बेरोजगार पदवीधर आहे. ती जिथे राहते तिथे वस्तीजवळच शासनाद्वारे एक बाजार समिती चालविण्यात येते. तिथे एक जागा रिक्त होती त्या करीता राधाने अर्ज केला आणि तिला एका लिपीकाच्या पदावर रु. ५००/– इतक्या निश्चित वेतनावर नेमणूक देण्यात आली. तथापि, त्या पदाकरिता तिला वास्तविकत: रु.२०००/– वेतन निश्चित केलेले होते.

प्रश्न : अशा तऱ्हेने वर्तन म्हणजे एक गुन्हा आहे काय?

उत्तर : होय. हा गुन्हा आहे. शोषण आहे, ज्याकरिता बाजार समिती दोषी आहे.

घटना तीन:–

पी.डब्लु.डी द्वारा दुष्काळ पीडीत लोकांच्या मदतीसाठी रस्ता निर्मितीचे काम चालू होते. या रस्त्याच्या निर्मिती मध्ये खुप मोठया संख्येने लोकांना काम देण्यात आलेले होते. त्यामध्ये श्रमिक महिला देखील सामील होल्या.

प्रश्न : अनुच्छेद २३/कलम २३ अशा परिस्थितीमध्ये कशा प्रकारे मदत करते?

उत्तर : समान कामासाठी समान वेतन दिले जाणे म्हणजेच कमीत कमी वेतन दिले जाणे न्याय संगत आहे. जर निश्चित कमीत कमी वेतनापेक्षा कमी वेतन मिळाले तर श्रमिक/कामगार अनुच्छेद २३ खाली न्यायालयातून समान वेतनाची मागणी करु शकतो.

- स्वातंत्र्याचा अधिकार जन्मापासून मृत्युपर्यंत सोबत राहतो.
- बोलण्याचे स्वातंत्र्य.
- कायदा व शांततेचा भंग होणार नाही या अटीवर सभा आयोजित करण्याचे स्वातंत्र्य.
- देशात कोठेही जाणे–येण्याचे व राहाण्याचे स्वातंत्र्य.
- नियमानुसार कोणताही धंदा, व्यापार, रोजगार करण्याचे स्वातंत्र्य.

जीवन जगण्याचा अधिकार (अनुच्छेद २१)

- सरकारचे हे कर्तव्य आहे की त्यांनी पोलिसांच्या मदतीने व्यक्तिच्या शरीर व संपत्तीचे रक्षण करण्यासाठी शांतता व व्यवस्था कायम ठेवावी आणि जनसामान्यांना उत्पन्नाची उत्तम संधी उपलब्ध करावी.
- सर्वांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.

- सर्वांना चांगल्या वातावरणात राहण्याचा व रोजगार कमाविण्याचा अधिकार आहे.
- आमले प्राण अथवा शरिराचे स्वातंत्र्य अथवा संपत्तीवर हल्ला होण्यापासून बचावासाठी कायदयाचे सहाय्य घेण्याचा अधिकार आहे.

शोषणाचे विरुध्द अधिकार:—

- मानवी शरिराचा व्यापार, बिगारी अथवा बळजबरीने मजुरी करावयास लावण्याला शोषण म्हणतात. हे मानवते विरुध्द गुन्हे आहेत. (अनुच्छेद २३)
- मानवी व्यापार म्हणजेच पुरुष, स्त्रिया व बालक यांची खरेदी, विक्री, शोषणाच्या वर्गात आहेत.(अनुच्छेद २४)
- अस्पृश्यता देखील शोषणाच्या वर्गात येते, ज्याच्या विरुध्द कायदेशीर अधिकार आहेत. (अनुच्छेद १७)

अटक आणि प्रतिबंध संरक्षणाचा अधिकार:—



अनुच्छेद २२ कायदेविषयक साक्षरता मालिकेतील मॉडयुल—११ "प्राण व दैहिक स्वातंत्र्यासंबंधी अधिकार" मध्ये याबाबत विस्ताराने सांगितलेले आहे.

- कायदा व्यवस्था कायम ठेवण्यासाठी आरोपीची अटक करणे आवश्यक होऊन जाते.
- दुस—या व्यक्तिच्या स्वांतत्र्याचे रक्षण करणेसाठी अटक होत असते.
- अटक व्यक्तिचे देखील काही मौल्यवान अधिकार असतात. ते खालील प्रमाणे नमुद करता येतील:—
  - अटक करण्याचे कारण जाणण्याचा अधिकार आहे.
  - आपल्या पसंतीच्या वकिलांचा सल्ला घेण्याचा अधिकार आहे.
  - अटकेपासून २४ तासांचे आत मॅजिस्ट्रेट समक्ष हजर केले जाण्याचा अधिकार आहे.

धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (अनुच्छेद २५—२८)

- सर्वांना आपआपल्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार आहे.
- कोणीही आपल्या धर्मानुरुप आचरण करुन समाजाचे कल्याण करु शकतो.
- वाईट रिती व चाली बंद करु शकतो.
- धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करु शकतो.
- धार्मिक शिक्षण देणे, धर्मानुरुप आयोजन करणे, उत्सव साजरे करणे, धर्मात सांगितलेल्या मार्गावर चालण्याचा अधिकार आहे.
- धर्माच्या अपमानाच्या अधिकार नाही.

संस्कृति व शिक्षणाचा अधिकार (अनुच्छेद २९,३० / कलम २९,३०)

- सर्व नागरिकांना आपल्या भाषा व संस्कृतीच्या रक्षणाचा अधिकार आहे.
- समाजातील सर्व वर्गांना शिक्षण घेण्याचा आणि आपली सांस्कृतिक परंपरा जपण्याचा अधिकार आहे.

घटनात्मक उपायांचा अधिकार:—

आपल्या कोणत्याही मौल्यवान अधिकारांची हानि/हनन होत असल्यास आम्ही काय करु शकतो.:—

- वर उल्लेखिलेला सर्व अधिकारांचे रक्षण करण्याचा अधिकार राज्यघटनेने नागरिकांना दिलेला आहे.
- मुलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी सरळ सर्वोच्च न्यायालयात (अनुच्छेद २२६) जाता येते.
- जनहितार्थ दावे/प्रकरण दाखल केले जाऊ शकतात.
- जर अधिकारांसोबतच त्यावरील उपाय नसतील तर ते अधिकार निरर्थक ठरतील.

# ६. आपले राजनैतिक अधिकार:—

कोणतीही व्यक्ति निवडणूक लढवू शकते आणि मतदान करु शकते, जर ती—

- वेडसर नसेल.
- न्यायालयाने वेडसर असल्याचे किंवा मानसिक रुग्ण असल्याचे घोषित केलेली नसेल.
- कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ असल्याने दिवाळखोर असल्याचे न्यायालयाने घोषित केलेले नसेल.
- भारतीय नागरिक असेल.
- कायदयाद्वारे अपात्र नसेल.

आपली न्यायपालिका:—

आपण जाणतोच की आपल्या देशात कायदयाचे राज्य आहे. कायदयाच्या राज्यामध्ये न्यायपालिकेचे स्थान सर्वात उंच आहे. न्यायालय अथवा कोर्ट, कायदयानुसार नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण करणे याला आपले परम कर्तव्य समजतात.

- आपल्या देशातील न्यायालय आहेत—

सर्वोच्च न्यायालय (सुप्रीम कोर्ट)

उच्च न्यायालय (हाय कोर्ट)

उच्च न्यायालय प्रत्येक राज्यामध्ये वेगळे किंवा सामाईक असतात.

उच्च न्यायालयाखाली इतर न्यायालये पुढील प्रमाणे आहेत.

| दिवाणी न्यायालय | फौजदारी न्यायालय | महसूल न्यायालय |
|---|---|---|
| जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालय | दंडाधिका–यांचे न्यायालय तसेच सत्र न्यायालय | महसूल न्यायाधिकरण |
| दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय | प्रथम श्रेणी दंडाधिकारी (मॅजिस्ट्रेट) यांचे न्यायालय | आयुक्तांचे न्यायालय |
| दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय | द्वितीय श्रेणी दंडाधिकारी (मॅजिस्ट्रेट) यांचे न्यायालय | जिल्हाधिकारी यांचे न्यायालय |
| जिल्हादंडाधिकारी यांचे न्यायालय | तृतीय श्रेणी दंडाधिकारी यांचे न्यायालय | उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी यांचे न्यायालय तहसीलदार/नायब तहसीलदार यांचे न्यायालय |

जिल्हा स्तरावरील न्यायव्यवस्था :–

- जिल्हयाचे सर्वात मोठे न्यायालय म्हणजे जिल्हा न्यायालय असते.
- या न्यायालयाच्या न्यायाधीशांना जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणतात.
- जिल्हा न्यायाधीशांचे खाली दिवाणी न्यायाधीश आणि न्यायदंडाधिकारी असतात.
- फौजदारीच्या जिल्हा न्यायालयाला सेशन कोर्ट म्हणजेच सत्र न्यायालय म्हणतात. दिवाणी स्वरुपाच्या न्यायालयाला जिल्हा न्यायालय म्हणतात.
- सत्र न्यायालयात सत्र न्यायाधीश आहेत.
- जिल्हा व सत्र न्यायाधीशांचे सहाय्याला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालये असतात. त्यांना अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणतात.

दिवाणी न्यायालय:–

- जिल्हा न्यायालयात रु.२०,००,०००/–(वीस लाख रुपये) पर्यंत मूल्य असलेले दिवाणी अपील चालतात.
- दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर)यांचे न्यायालयात कोणत्याही मूल्याची दिवाणी प्रकरणे चालतात.
- दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात रु.५,००,०००/–(पाच लाख रुपये) पर्यंत मुल्य असलेले दिवाणी प्रकरणे चालतात. त्यांचे निर्णयाविरुध्द अपील जिल्हा न्यायालयात चालते.

फौजदारी न्यायालय:—

- फौजदारी अथवा गुन्हेगारीशी संबंधित प्रकरणे जिल्हयातील सर्वात मोठ्या न्यायालयात म्हणजेच "सत्र न्यायालयात" चालतात.
- या न्यायालयाच्या न्यायाधीशांना "सत्र न्यायाधीश " म्हणतात.
- सत्र न्यायाधीशांच्या मदतीसाठी अतिरिक्त सत्र न्यायाधीश असतात.
- फौजदारी न्यायालयामध्ये जन्मठेप अथवा मृत्यू दंडापर्यंतची शिक्षा देण्याचे अधिकार असतात.
  - मुख्य न्यायदंडाधिकारी यांना ७ वर्षांपर्यंत कैदेची आणि रु.५०,००० /— पेक्षा जास्त दंडाची शिक्षा करण्याचा अधिकार आहे.
  - न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी) यांना ३ वर्षापर्यंत कैदेची आणि ५०,००० /— पर्यंत द्रव्य दंडाची शिक्षा करण्याचे अधिकार आहेत.
  - गंभीर गुन्ह्यांची प्रकरण सत्र न्यायालयात चालतात.

महसुला संबंधी न्यायालय:—

या न्यायालयाअंतर्गत महसुल न्यायाधीकरण, आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी अथवा उपजिल्हाधिकारी, तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांची न्यायालये येतात.

इतर न्यायालये:—

इतर न्यायालयांमध्ये उत्पन्नकर, कामगार, औद्योगीक, कौटुंबिक, सहकार न्यायालये इत्यादी येतात.

पंचायती न्यायालय अथवा ग्राम न्यायालय:—

पंचायती न्यायालय अथवा ग्राम न्यायालय यांचा संबंध केंद्रीय ग्राम न्यायालयाशी आहे.

- पंचायत राजमध्ये प्रत्येक गावामध्ये ग्रामसभा गठीत केली जाते.
- ग्राम सभेचे अध्यक्ष सरपंच असतात.
- सरपंच नसल्यास उपसरपंच अध्यक्षपद सांभाळतात.
- ग्रामीण भागात साधी प्रकरणे ग्राम न्यायालयामध्ये निकाली काढली जातात.
- राज्य सरकार १० किंवा जास्त ग्रामपंचायती मिळून एक ग्राम न्यायालय स्थापन करु शकते.
- ग्राम न्यायालया समोरील कोणत्याही प्रकरणा मधील निर्णय अंतिम असतो.
- या उलट दिवाणी प्रकरणांमध्ये दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांचे समक्ष, फौजदारी प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकाऱ्या समोर पुन:निरीक्षण अपील दाखल करता येते.



# ७.आपल्या विशेष अधिकारांसाठी स्थापित/गठित आयोग

मानव अधिकार आयोग :–

- कोणत्याही व्यक्तीच्या जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित अधिकारांचे रक्षण करणे हेच आयोगाचे कार्य आहे.
- जेंव्हा कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारांचे उल्लंघन झाले असेल आणि शासकीय कर्मचारी किंवा लोकसेवक किंवा अधिकारी त्यांची मदत करण्याऐवजी स्वत: त्या व्यक्तीच्या मानव अधिकारांचे उल्लंघन करीत असेल तर एका साध्या कागदावर किंवा फोनवरुन तक्रार करता येईल.
- ज्या संस्था, कारखाने, दवाखाने, तुरुंग, शाळा, सार्वजनिक जागांवर किंवा ठिकाणी किंवा सुधारगृह इत्यादी ठीकाणी लोकांना आश्रय दिला जातो किंवा बंदी बनविण्यात येते, जेथे उपचार केले जातात तेथे सर्व व्यवस्था व्यवस्थित आहेत. याबाबत मानव अधिकार आयोग काळजी घेऊ शकते.
- गुन्हा घडल्यावर किंवा पोलिसांना प्रथम वर्दी अहवाल (F.I.R.) किंवा माहिती दिल्यावर जर पोलिसांद्वारे कारवाई केली जात नसेल किंवा इतर कोणत्याही भ्रष्ट कारणांसाठी कारवाई होते तेव्हा याबाबतची तक्रार आयोगाकडे केली जाऊ शकते.
- राज्यांतील मानव अधिकार आयोगाचा पत्ताखालील प्रमाणे :

अनुसुचित जाती / जमाती आयोग:–

- भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३३८(कलम ३३८) मध्ये अगोदर एक राष्ट्रीय अनुसूचित जाति आणि अनुसूचित जमाती आयोग स्थापन करणे बाबत तरतूद होती.
- सन २००३ मध्ये ८७व्या राज्यघटना दुरुस्ती विधेयकाद्वारे एक नवीन अनुच्छेद ३३८(क)(कलम ३३८ क) समाविष्ट करुन आता एका ऐवजी दोन आयोग स्थापित करावयाचे आहेत.

  पहिला– राष्ट्रीय अनुसूचित जाति आयोग

  दुसरा – राष्ट्रीय अनुसूचित जमाति आयोग
- प्रत्येक आयोगामध्ये एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि तीन सदस्य असतात.
- जवळजवळ सर्व राज्यांमध्ये अनुसूचित जाति व जमाति आयोग स्थापित करण्यात आलेले आहेत.



अल्प संख्यांक आयोग:—

- अल्प संख्यांकासाठी विकास व सरकारी कामांची देखरेख.
- अल्प संख्यांक लोकांचे कल्याण आणि संरक्षणाचे कामांवर देखरेख
- अल्प संख्याकांचा विकास, कल्याण आणि संरक्षणा पासुन वंचित केल्याबाबतच्या तकारींचे निराकरण शासनाने करावयाचे.
- अल्पसंख्यांकांशी होत असलेला भेदभाव थांबविण्या संबंधी उपाय योजनांची शिफारस करणे.
- अल्पसंख्यांकाची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाचा अभ्यास, शोध व विश्लेषण करणे.
- आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतात.
- प्रकरणांची नोंदणी करुन ते नोटीस पाठवु शकते.
- दोषी आढळल्यावर सरकारी कारवाईसाठी लिखित रुपात देणे.
- अल्पसंख्यांकासाठी अनेक योजना या आयोगाच्या माध्यमातून चालू आहेत.



महिला आयोग:—

संपुर्ण देशातील सर्व राज्यांमध्ये महिला आयोग स्थापन करण्यात आलेले आहेत. आपल्या राज्यांच्या महिला आयोगाचा पत्ता खालील प्रमाणे:—

पत्ता:—

गृह निर्माण भवन, म्हाडा ईमारत, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.

महिला आयोगाचे कार्य:—

- देशात महिलांना स्वावलंबी बनविणे.
- महिलांच्या हितांची देखभाल व त्यांचे रक्षण करणे.
- महिलांसोबत केला जाणारा भेदभाव संपविणे.
- महिलांचा अभिमान व सन्मानाची खात्री करणे
- महिलांना विकासासाठी समान संधी मिळवून देणे.
- महिलांवर होत असलेले अत्याचार किंवा गुन्हयांबद्दल कारवाई करणे.

महिला आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत ते खालीलप्रमाणे:—

- कोणत्याही व्यक्तिवर समन्सची बजावणी करुन त्यास हजर करवू शकते. शपथपत्र घेऊन चौकशी करु शकते.
- दस्तऐवज/कागदपत्र मागवु शकते.
- शपथपत्रावर पुरावा नोंदवु शकते.

- महिलांच्या अधिकारांचे रक्षण करण्याचे काम आयोग करते.
- कोणत्याही महिलेवर अत्याचार झाल्यावर ती वर दिलेल्या पत्त्यावर साध्या कागदावर आयोगाकडे तक्रार दाखल करु शकते. त्यावर कार्यवाही केली जाते आणि महिलांना न्याय मिळवून देण्यात येतो.

मागासवर्ग आयोग:–

आयोगाचे उद्देश–

- मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी बनविण्यात आलेले कायदे आणि त्यांना उपलब्ध असलेल्या सुविधांच्या अधिकारांचे रक्षण करणे.
- मागासवर्गीयांसाठी कल्याण व विकासासाठी योजना व धोरण बनविणे.
- मागासवर्गीयाना फायदे मिळवून देण्यासाठी शिक्षण, सामाजिक, आर्थिक विकासासाठी कार्यक्रम तयार करणे.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शाळेत व कॉलेजमध्ये शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून देणे.



# कायदेविषयक मदत

# १. कथा – आधार

मध्यरात्र उलटून गेली होती.

राहुल नगर झोपडवस्तीमध्ये मोठा प्रकाश दिसला. पोलीसांची जीप आली होती. जीप थांबली. त्यातून चार हवालदार उतरले आणि मंगलाच्या घराचा दरवाजा जोरजोरात ठोठावू लागले. दरवाजा उघडला. मंगला आणि तिचा मुलगा गोपाळ गरीब जनावराप्रमाणे समोर उभे होते. पोलीस गोपाळला पकडून घेऊन गेले.

गोपाळचा आवाज दूरपर्यंत ऐकू येत होता "मी चोरी नाही केली .............. मी चोरी नाही केली" मंगला काहीच करु शकत नव्हती. गोपाळ ज्या किराणाच्या दुकानात काम करीत होता त्या दुकानात पाच दिवसांपूर्वी चोरी झालेली होती. ज्या रात्री चोरी झाली होती तेंव्हा गोपाळ त्याच्या घरीच होता हे पूर्ण वस्तीला माहित होते. तो आजारी होता. संशयित म्हणून दुकान मालकाने गोपाळचे नाव लिहून दिले होते. गोपाळ निर्दोष असूनसुध्दा भितीपोटी इथे तिथे लपून छपून रहात होता. तो कालच रात्री घरी आला होता.

घरी फक्त त्याची आईच होती. त्याचा दारुडा बाप कैलास वेगळा रहात होता. चार दिवस निघून गेले.



गोपाळची पोलीस ठाण्यात चौकशी केल्यानंतर त्याला कारागृहात पाठविण्यात आले.

मदतीसाठी गोपाळची आई मंगला तीन दिवस इकडे तिकडे फिरत राहिली. परंतु कुठूनही पैशाची व्यवस्था झाली नाही. पैसे असते तर वकील केला असता. मुलाला जामीनही मिळाला असता आणि खटलाही लढवता आला असता.

मंगला एका छोट्या दुकानात धान्य साफ करण्याचे काम करीत होती. शेवटी थकून भागून ती कामावर गेली. मंगलाने दुकान मालक संताराम यांना सर्व कहाणी सांगितली. तो एक चांगला माणूस होता.

दुकान मालक धीर देत मंगलाला म्हणाला "गरीब व गरजू लोकांची मदत कायदा सुध्दा करतो"

मंगलाने विचारले "मग मी काय करु मालक"

माझं जर ऐकत असशील तर सर्वात प्रथम तुझ्या पतीकडून खर्च का नाही मागून घेत?



त्याच्यावरसुध्दा कुटुंबाची काही जबाबदारी आहे आणि अशा कठीण परिस्थितीत तो तोंड फिरवून बसला आहे.

"खर्च मी कसा मागू, खटल्यासाठी लागणारा पैसा मी कुठून आणू?"

संतराम म्हणाला "लोक अदालतमध्ये खटला दाखल कर, तिथे एकही पैसा लागत नाही. मी तुला त्याच्या कार्यालयात घेऊन जातो आणि अर्जही लिहून देतो.

संतरामचे बोलणे मंगलाच्या लक्षात आले. संतरामच्या मदतीने तिने तिची केस लोक अदालतमध्ये चालविण्यासाठी अर्ज दिला. लोक अदालतीचे कामकाज सुरु झाले.

मंगलाचे पती कैलास यांना बोलावण्यात आले. मंगलाचा अर्ज वकिलांनी काळजीपूर्वक वाचून कैलासला विचारले –

"कैलास आयुष्यभर साथ देऊ असे वचन देऊन तुम्ही मंगलाबरोबर लग्न केले होते, परंतु तुम्ही स्वतःच्या मौजमस्तीसाठी कुटुंबाची जबाबदारी विसरलात. तुम्ही ना चांगला पती बनू शकालात ना चांगला पिता. तुमचा मुलगा देखील कारागृहात बंदिस्त आहे".

मंगला म्हणाली, ............ तो निर्दोष आहे.

न्यायाधीश साहेब म्हणाले, त्याचा निर्णय न्यायालय देईल, तू गप्प बस मंगला, सर्वात पहिला गुन्हा तर कैलासने केला आहे.

कैलास शरमिंदा होऊन गुपचूप ऐकत होता.

मध्ये बसलेले न्यायाधीश साहेब म्हणाले "अजूनही काही बिघडलेले नाही, आपल्या घरी परत जा आणि कुटुंबाची जबाबदारी घे, दारु पिणे सोडून दे."



कैलासला काहीच बोलण्याचे धाडस होत नव्हते.

वकील म्हणाले "तुम्ही तुमचे घर सोडून दूर गेला आहात, तुम्ही घरी परत जा यातच शहाणपण आहे."

कैलासचे भरुन आलेले डोळे मंगलाकडे परत जाण्याची इच्छा असल्याचा संकेत देत होते.

न्यायाधीश साहेब म्हणाले की, दोघांनीही बाकड्यावर बसून घ्या आणि आपापसात चर्चा करा.



हो, अजून एक गोष्ट तुम्हाला सांगतो – तुमचा मुलगा कारागृहात बंदिस्त आहे आणि तुम्ही सांगता त्याप्रमाणे जर तो निर्दोष असेल तर तो सुटेल.

"परंतु आमच्याकडे खटला चालविण्यासाठी पैसे नाहीत" मंगला म्हणाली.

वकील म्हणाले "तुमच्या सारख्या गरीब व गरजू लोकांच्या मदतीसाठी कायद्याने "कायदेशीर मदत" योजनेची तरतूद केलेली आहे. ज्यामध्ये वकीलांची फी व संपूर्ण कार्यवाहीचा खर्च मिळतो."

कैलास आणि मंगला दोघेही हात जोडून उभे होते. कैलास मंगलाला एवढेच म्हणाला "चल घरी चल."

कायदेविषयक सहाय्य व लोकअदालत यांच्याबाबत सविस्तर जाणून घेऊया.

# २. कायदेविषयक मदत

भारतीय संविधानाच्या परिच्छेद २१ व ३९ अ नुसार नागरिकांसाठी मोफत कायदेविषयक सहाय्य देण्याची व्यवस्था करणे हे राज्याचे कर्तव्य आहे.



प्राचीन काळापासून भारत देश हा न्यायप्रिय देश आहे. नीति, न्याय व धर्म हे आपले आदर्श आहेत. अन्यायाचा वेळोवेळी तिरस्कार केला गेला आहे. ग्रंथामध्ये गरीब, गरजु, असहाय्य लोकांचे जीवन वाचविल्याबद्दलच्या अनेक गोष्टी आपल्याला वाचायला मिळाल्या आहेत.

कायदा व न्यायाच्या क्षेत्रात देखील गरीब, गरजू व असहाय्य व्यक्तींना कायदेविषयक मदत उपलब्ध करुन देण्याबाबतच्या तरतूदी केल्या गेल्या आहेत.

**कायदेविषयक मदत म्हणजे काय?**

कोणतीही व्यक्ती पैशाच्या अभावामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे आपल्या अधिकारांपासून वंचित राहू नये म्हणून कायदयाने त्यांना वकीलाची सेवा व इतर सुविधा प्राप्त करुन दिल्या जातात. यालाच कायदेविषयक मदत असे म्हटले जाते.

**दिवाणी प्रकरणात उपलब्ध असलेल्या मदतीचे स्वरुप**

न्यायालयात सुरु असलेल्या प्रकरणी एखादा पक्ष वकिलाअभावी आपली बाजू न्यायालयात मांडू शकत नसेल तर न्यायालयात त्याची बाजू मांडण्याकरिता न्यायालय वकील

नेमू शकतात. त्याचबरोबर कोणतीही गरीब व्यक्ती न्यायालयीन शुल्क न भरता आपले प्रकरण न्यायालयात दाखल करु शकते. जर अशा वकीलाने पक्षकाराकडे पैशाची मागणी केली तर त्याबाबतची तक्रार विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयातील अधिकाऱ्याकडे करता येते.

दंड प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत देण्यात येणारी कायदेशीर मदत

एखादी व्यक्ती कोणत्याही गुन्ह्यातील आरोपी असेल किंवा ज्याच्याविरुध्द फौजदारी न्यायालयात कोणत्याही प्रकारची कारवाई सुरु करण्यात आली असेल तर अशी व्यक्ती आपल्या पसंतीच्या वकीलाद्वारे आपला बचाव करु शकते. (कलम ३०३)

आरोपी स्वत:चा बचाव करण्यासाठी वकील नियुक्त करण्याकरिता आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे असे जर न्यायालयाच्या निदर्शनास आले तर त्या आरोपीला न्यायालयाने सरकारी खर्चाने वकील उपलब्ध करुन दिला पाहिजे. (कलम ३०४)

कायदेविषयक मदत कोणास मिळू शकते



अ. अनुसुचित जाती / अनुसुचित जमातीचे सदस्य.

ब. गरीब, पीडित तसेच वेठबिगार.

क. महिला व बालक

ड. मानसिकरित्या दुर्बल व असमर्थ व्यक्ती

असमर्थ म्हणजे



- कमी ऐकू येणारा
- जो चालू फिरु शकत नाही
- अशक्त, ज्याला कुष्ठरोग आहे
- अंध अथवा मनोरुग्ण
- सार्वत्रिक आपत्ती, जातीय हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर, दुष्काळ, भूकंप किंवा
- औद्योगिक आपत्तीचे बळी
- फॅक्टरी किंवा कंपनीत काम करणारे मजूर
- तुरुंगातील कैदी
- ज्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न रुपये ५०,०००/– पेक्षा जास्त नाही अशा व्यक्ती.

प्रश्न : कोणत्या प्रकारची कायदेविषयक मदत मिळू शकते?

उत्तर : वर नमूद केलेल्या व्यक्तींपैकी जर एखाद्या व्यक्तीचा खटला न्यायालयात सुरु असेल किंवा खटला दाखल करायचा असेल त्यासाठी आवश्यक असलेले न्यायालयीन शुल्क, टायपिंग खर्च, साक्षीदारांचा खर्च, न्यायालयीन नकला प्राप्त करुन घेण्याचा खर्च, प्रकरण इंग्रजीत असेल तर त्याचा हिंदी/मराठी अनुवाद करण्याचा खर्च इ. खर्च दिले जातात. वकिलांना खटला लढवण्यासाठी पैसे देण्याची

गरज नसते. त्याचा खर्च विधी सेवा प्राधिकरण किंवा विधी सेवा समिती यांचाकडून भागविला जातो.

प्रश्न : कोणकोणत्या न्यायालयात कोणकोणत्या प्रकरणात कायदेविषयक मदत दिली जाते?

उत्तर : कायदेविषयक मदत ही सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालय, आयुक्त, जिल्हाधिकारी, कामगार न्यायालय, तहसिलदार न्यायालय इत्यादी. सर्व न्यायालयातील तसेच फौजदारी, दीवाणी, अपील अशा प्रकारच्या सर्व प्रकरणात दिली जाते.




प्रश्न : कायदेविषयक मदत केव्हा नाकारली जाते?

उत्तर :
- मानहानी / बदनामी बाबतचे खटले
- न्यायालयाचा अवमान किंवा शपथभंग प्रकरणात
- निवडणूक संदर्भातील प्रकरणे
- ज्या शिक्षेमध्ये रुपये ५०/— पेक्षा जास्त दंड नाही
- आर्थिक किंवा सामाजिक गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये
- प्रकरणात विशेष पक्षकार नसल्यामुळे
- व्यापार संबंधात पैशाच्या वसुलीसाठी असलेल्या प्रकरणात खटला लढविण्यासाठी

वरील प्रकरणांमध्ये कायदेविषयक मोफत सेवा व सहाय्य मिळू शकत नाही.

कायदेविषयक मदतीचे तीन स्तर

| राज्य विधी सेवा प्राधिकरण | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण | तालुका विधी सेवा समिती |
|---|---|---|

राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय राज्याच्या प्रमुख शहरात असते जसे महाराष्ट्रामध्ये मुंबई.

प्रत्येक जिल्हयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय आहे. याच प्रकारे तालुक्याच्या ठिकाणी तालुका विधी सेवा प्राधिकरणाची कार्यालये स्थापण्यात आलेली आहेत.

कोणत्याही पात्र व्यक्तीला प्रकरण उच्च न्यायालयात दाखल करायचे असेल किंवा त्याच्याविरुध्द उच्च न्यायालयात प्रकरण चालू असेल तर अशा व्यक्ती राज्य विधी सेवा प्राधिकरणास अर्ज देऊन कायदेविषयक मदत उपलब्ध करुन घेऊ शकतात.

जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या न्यायालयात कायदेविषयक मदत

जिल्ह्यात कोणत्याही न्यायालयात कायदेविषयक मदत मिळविणेसाठी जिल्हा न्यायालयातील कार्यालयात जाऊन सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा जिल्हा न्यायाधीश यांच्या नावे अर्ज करुन मदत मिळवता येते.



त्याचप्रमाणे तालुक्याच्या ठिकाणी कोणत्याही पात्र व्यक्तिस कायदेविषयक मदत मिळविण्यासाठी अध्यक्ष किंवा सचिव, तालुका विधी सेवा समिती यांचे नावे अर्ज करावा लागतो त्यानंतर ते कायदेविषयक मदत मिळवू शकतात.

# ३. लोक न्यायालय

न्यायालयीन कामकाजाची पध्दत लांबलचक असल्याकारणाने बरेचसे दावे न्यायालयात प्रतिक्षाधीन आहेत. न्यायालयीन कामकाज हे सर्वांसाठी एक चिंतेचा विषय ठरलेला आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन लोक न्यायालयाचे नवीन रुप पुढे आले. लोक न्यायालय हे न्यायाचे एक रुपच आहे जे समझोत्याच्या आधारावर ठरविण्यात आलेले आहे. ज्यामध्ये ना कोणत्याही पक्षाची जीत होते ना हार. आपापसात चर्चा करुन समझोता होऊ शकतो.

लोक न्यायालयाची ठळक वैशिष्ट्ये

- ज्यामध्ये पक्षकारांनी आपापसात समझोता करुन वा पॅनल सदस्यांच्या निर्णयावर प्रकरण संपविण्यात येते.




- दोन्ही पक्षकारांत असलेली कटुता संपवून सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.
- लोक न्यायालयात काहीही खर्च येत नाही.
- प्रकरणात निर्णय लवकर होतो. वेळ वाचतो.
- लोक न्यायालय पॅनलवर सेवानिवृत्त न्यायाधीश, शिक्षक, समाजसेवक आदींचा समावेश असतो.
- लोक न्यायालयासमोर देण्यात आलेल्या निर्णयाच्या प्रती विनाशुल्क पक्षकारांना तावडतोब दिल्या जातात.
- लोक अदालतीसमोर देण्यात आलेला निर्णय हा अंतिम असतो. त्याविरुध्द कोणतेही अपील होत नाही.

लोक न्यायालयाचे हक्क

लोक न्यायालयास त्या सर्व केसेसमध्ये पॅनल किंवा समझोत्याद्वारा प्रकरण मिटवण्याचे अधिकार आहेत.

- जे न्यायालयात प्रलंबित आहेत व वर्षानुवर्षे सुरु आहेत.
- जे वाद अद्याप न्यायालयात दाखल केलेले नाहीत.

लोक अदालतीसमोर फौजदारी गुन्ह्यांच्या प्रकरणात तडजोड केली जात नाही ज्यात कायद्यानुसार समझोता होऊ शकत नाही. जसे एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीची हत्या केली असेल अशा परिस्थितीत ज्या व्यक्तीने हत्या केली आहे ती दुसऱ्या पक्षकाराबरोबर समझोता करु शकत नाही.



कोणकोणत्या प्रकरणात लोक न्यायालयाद्वारा समझोता केला जातो.

मजूरी संदर्भातील प्रकरणे :

- निलंबन, कंत्राटी श्रम
- भविष्यनिधी संदर्भातील प्रकरण
- मजूरी, बोनस

नुकसान भरपाई संबंधित :

- मोटार अपघातात मृत्यु झालेल्या किंवा कायमस्वरुपी अपंगत्व आलेल्या प्रकरणात.
- इतर प्रकरणे जी मोटार अपघाताशी संबंधित आहेत.
- रेल्वे अपघात
- वीज दुर्घटना



कौटुंबिक समस्या

- दोघांच्या संमतीने घटस्फोट
- विवाहसंबंध पुर्नस्थापित करणे
- मुलांचे संरक्षण
- पोटगी
- लहान मुलांचे संरक्षण
- मुस्लिम विवाह कायद्याशी निगडीत प्रकरणे
- हिंदू विवाह कायद्याशी निगडीत प्रकरणे
- ख्रिश्चन विवाह कायद्याशी निगडीत प्रकरणे

इतर प्रकरणे



- जामीनासंदर्भातील प्रकरणे
- पोटगी संदर्भातील प्रकरणे
- बँकेच्या कर्ज वसुली संदर्भात
- प्रॉपर्टी
- जी फौजदारी व दिवाणी स्वरुपाची प्रकरणे सन १९८६च्या पूर्वी उच्च न्यायालयात दाखल केलेली आहेत अशा प्रकरणात
- अशा विषयी जिथे दोन्ही पक्षकार सहमत असतील

लोक न्यायालयातर्फे अंमलात आणली जाणारी पध्दत



- जेंव्हा एखाद्या पक्षकारास आपले स्वत:चे प्रकरण लोक अदालतीपुढे ठेवून निकाली काढायचे असे वाटल्यास तशा आशयाचा अर्ज लोक अदालतीपुढे पाठविण्यात यावा.
- जेव्हा न्यायालयास दिसून येईल की, सदर प्रकरण लोक अदालतीपुढे निकाली काढण्यायोग्य आहे तेंव्हा प्रकरण लोक न्यायालयापुढे पाठवण्याचा आदेश दिला जातो.
- सदर कार्यालयीन पध्दत पूर्ण झाल्यानंतर प्रकरण लोक अदालतीपुढे ठेवण्यात येईल व सुनावणी सुरु केली जाईल. दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ दिला जातो व प्रकरणात समझोता करण्याचा प्रयत्न केला जातो.
- प्रयत्नानंतरही पक्षकारांमध्ये समझोता झाला नाही तर ते प्रकरण ज्या न्यायलयातून प्राप्त झालेले आहे त्या न्यायालयात परत पाठविण्यात येते. न्यायालयात त्या प्रकरणात पुन्हा न्यायालय कार्यवाही सुरु करते ज्या पातळीवर ते लोक अदालती पुढे पाठविण्यात आले हाते.
- लोक न्यायालयात देण्यात आलेल्या प्रकरणातील निर्णय हे दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेल्या निर्णयासारखेच असतात.
- लोक न्यायालयापुढे देण्यात आलेला निर्णय हा अंतिम असतो व त्याविरूध्द अपिलात जाता येत नाही.

- लोक न्यायालयाचे आयोजन प्रत्येक महिन्याला तालुका न्यायालय, जिल्हा न्यायालय किंवा उच्च न्यायालय येथे केले जाते. लोक अदालतींचे आयोजन हे जास्तीत जास्त सुट्टीच्या दिवशी आयोजित करण्यात येते.

लोक अदालतीचे फायदे

- पक्षकारांमध्ये सद्भावना निर्माण होते
- वेळ, पैसा व मेहनतीची बचत होते
- समेट घडून आल्यानंतर न्यायालयीन शुल्क परत मिळते
- लोक न्यायालयाद्वारा देण्यात आलेल्या निर्णयाच्या आदेशाच्या प्रती विनाशुल्क पक्षकारांना देण्यात येते.
- कायमची भांडणे मिटून सुख शांती मिळते.
- वकीलाची आवश्यकता नाही.
- लोकन्यायालयात दोन्ही पक्षकार समाधानी होतात.

**ध्यानात ठेवा**

खटला जिंकलेली व्यक्ती आर्थिकदृष्टया कमजोर होते आणि हरलेली व्यक्ती मानसिक रित्या

अर्ज कोणाला दयायचा?

- उच्च न्यायालयात सचिव/न्यायाधीश, उच्च न्यायालय विधी सेवा समिती किंवा विधी सहायता अधिकारी, उच्च न्यायालय परिसर
- जिल्हा पातळीवर जिल्हयाचे अध्यक्ष, जिल्हा न्यायाधीश, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा जिल्हा विधी सहायता अधिकारी, जिल्हा न्यायालय परिसर
- तालुका पातळीवर अध्यक्ष/न्यायाधीश, तालुका विधी सेवा समिती, तालुका न्यायालय परिसर

# ४. मध्यस्थी

न्यायालयाच्या कक्षेबाहेर वाद विवाद, भांडणतंटा सोडविण्यासाठी कायदयाची मध्यस्थी ही एक तरतूद आहे. ही आजच्या काळाची एक गरज आहे. मध्यस्थीच्या माध्यमातून आपले वाद विवाद मिटविण्यासाठी स्वत: पक्षकारांतर्फे ठरविले जाते. पक्षकारांमध्ये समेट घडूवन आणण्याचे काम मध्यस्थी केंद्रावर कार्यरत असलेले समाज सेवक, वकील, प्रशासकीय अधिकारी करतात.

दोन पक्षकारांमधील भांडणे मिटविण्यासाठी तीन पध्दतींचा वापर केला जातो.

- न्यायालयात दावा दाखल करुन
- समेटच्या माध्यमातून

- आपल्या पसंतीनुसार मध्यस्थीची निवड करुन
- न्यायालयात दावा दाखल करुन न्यायालयाच्या निर्णयापर्यंत पोहोचणे हा एक लांबलचक व गुंतागुंतीचा प्रकार आहे. मध्यस्थीमध्ये असे होत नाही. यामध्ये दोन्ही पक्षकारांच्या पसंतीने मध्यस्थीची नियुक्ती करण्यात येते.
- न्यायालयाच्या कक्षेबाहेर वाद–विवाद, भांडणतंटा सोडविण्यासाठी कायद्याची मध्यस्थी ही एक तरतूद आहे. हे भविष्यात खूप जरुरीचे आहे. हे सर्व पक्षकारांमार्फत ठरविण्यात येते की त्यांचा दावा मध्यस्थीद्वारा समेट करण्यात यावा.
- पक्षकारांमध्ये समेट घडूवन आणण्याचे काम मध्यस्थी केंद्रावर कार्यरत असलेले समाज सेवक, वकील, प्रशासकीए अधिकारी करतात.
- मध्यस्थीद्वारा केलेल्या समेटास ठरावपत्र किंवा संमतीपत्र म्हणतात.
- समेटाचे कामकाजात पक्षकारांच्या पसंतीनुसार संपविता येते. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यांच्यातील भांडण समेटाच्या माध्यमातून सोडविण्यात येते.

<u>मध्यस्थीची पध्दत</u>



- मध्यस्थी म्हणजे भांडणे आपापसात मिटविण्याचा सरळ व सोपा मार्ग आहे.
- मध्यस्थीद्वारा पक्षकारांमध्ये समेट कोणतेही दडपण न ठेवता, कोणताही दबाव न लादता घडवून आणतात.
- मध्यस्थी अधिकारी यशस्वी मध्यस्थीकरिता पूर्ण प्रशिक्षित असतात. सर्व पक्षकारांना त्यांत्रे भांडणात समेट घडवून आणण्यासाठी मार्ग काढतात.

<u>मध्यस्थीमध्ये खाली नमूद केलेल्या पध्दतीप्रमाणे कामकाज चालते :</u>

- मध्यस्थी अधिकारी पक्षकारांना मध्यस्थीच्या माध्यमातुन कामकाजाची जाणीव करुन देतात. तसेच त्याबाबतचे नियम किंवा गोपनीयतेच्या बाबतीतही सांगतात.
- मध्यस्थी अधिकारी सर्व पक्षकारांबरोबर मिळून त्यांच्या विवादा संदर्भात माहिती जाणून घेतात.
- मध्यस्थी अधिकारी समेट घडवून आणण्यासाठी त्यांच्यामध्ये चांगले वातावरण तयार करतात.
- गरज भासल्यास मध्यस्थी अधिकारी प्रत्येक पक्षकाराशी वेगवेगळी चर्चा करतात.
- वेगवेगळी चर्चा करतेवेळी प्रत्येक पक्षकार आपले स्वत:चे मुद्दे मध्यस्थी अधिकाऱ्यासमोर

मांडतात. त्यामध्ये गोपनीयता ठेवली जाते.

- विवाद मिटल्यानंतर मध्यस्थी अधिकारी सर्व पक्षकारांना समेटाची विचारणा करतात. त्यांना अटी समजावून सांगतात. त्या समेटाचे रुपांतर लिखित स्वरुपात केले जाते. ज्यावर सर्व पक्षकार स्वाक्षरी करतात.

मध्यस्थी अधिकाऱ्याचे काम

- मध्यस्थी अधिकारी पक्षकारांमध्ये समेटासाठी, सलोख्याचे वातावरण निर्माण करतो.
- पक्षकारांमध्ये आपापसात चर्चा व विचाराचे वातावरण तयार करतात.
- समेटादरम्यान येणाऱ्या अडचणी जाणून घेतात.
- चर्चेतून निर्माण होणारा मार्ग पक्षकारांसमोर मांडतात.
- सर्व पक्षकारांना त्यांच्या हिताची जाणीव करुन देतात.
- समेटाच्या अटी समजावून सांगतात किंवा पक्षकार स्वखुशीने समेटासाठी तयार होतील असा मार्ग सुचवतात.

मध्यस्थीचे फायदे

- काही वेळा प्रकरणे बरीच गुंतागुंतीची असतात, अशा वेळी त्या प्रकरणात न्यायालयातील विशेष तज्ञांचा सल्ला घ्यावा लागतो. अशी प्रकरणे समेटाच्या दृष्टीने निकाली काढण्यासाठी त्या संदर्भातील ज्ञान असलेल्या लोकांच्या मध्यस्थीने मध्यस्थी केली जाते त्यामुळे प्रकरणाचा निकाल चांगल्या रितीने होतो.
- मध्यस्थीमध्ये भांडणे मिटवल्यामुळे वेळ वाया जात नाही.



- पक्षकारांच्या पसंतीनुसार मध्यस्थी अधिकारी निवडले जातात. यामुळे दोन्ही पक्षकारांच्या सोयीनुसार समेटाच्या सुनावणीचे स्थळ व वेळ ठरविली जाते.
- मध्यस्थी अधिकारी पक्षकाराने सुचविलेल्या स्थळाचे निरिक्षण व्यवस्थितरित्या करतात जे न्यायालयात शक्य होत नाही.
- न्यायालयात वारंवार घालावे लागणारे खेटे व वारंवार न्यायालयात मिळणाऱ्या तारखा यापासून सुटका मिळते.
- मध्यस्थी खूपच सरळ व सोयीस्कर आहे.
- याद्वारे प्रकरणात कायमस्वरुपी मार्ग काढला जातो.
- निर्णयात पक्षकारांच्या संमतीला जास्तीत जास्त प्राधान्य दिले जाते.
- मध्यस्थी हे सामाजिक सलोखा दृढ करण्याच्या दृष्टीने मदत करते.

# पोलीसांसंबंधित अधिकार

# १. पहिली खबर (एफ.आय.आर.) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ अन्वये

कायदा व सुव्यवस्था सुरक्षित राहण्यासाठी घटनेत केलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे जेणेकरुन अपराध घडणार नाहीत. शासनाने केलेल्या नियमांचे पालन करण्यासाठी पोलिसांना काही विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. काही वेळेला अशाही तक्रारी येतात की पोलिसांनी त्यांच्या अधिकाराचा व शक्तीचा गैरवापर केला. यासाठी घटनेने नागरिकानांही अधिकार दिलेले आहेत, ते जाणून घेणे आवश्यक आहे, ते समजून घेऊन त्यांचा उपयोग करणे आवश्यक आहे.

१ आपल्या देशाचा कायदा सर्वांसाठी समान आहे.

२ नागरिकांचे रक्षण व कायद्याचे पालन करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे.

३ कायदेशीर सुरक्षा मिळविणे हा सर्वांचा अधिकार आहे.

४ पोलिसांना विशेष अधिकार दिले आहेत म्हणजे मनमानी करणे नव्हे.

५ दुर्व्यवहार केल्यावर पोलिसांनाही दंड केला जाऊ शकतो.

६ पोलिसांची मदत घेण्याकरिता हे जरुरीचे आहे की, पोलिसांना आपण पूर्ण मदत केली पाहिजे.



## घटना -एक

आमची मुलगी कविता जेंव्हा शाळेतून घरी येते तेंव्हा तिला गल्लीतील काही टुकार मुले छेडतात.

## घटना-दोन

शर्माजी यांचे घरी चोरी झाली तेंव्हा त्यांच्या मुलाने चोरांना ओळखले होते परंतु चोर पळून गेले. शर्माजी पोलिस ठाण्यात जाण्यास घाबरत होते कारण दोन दिवसांपूर्वी त्यांच्या घरात झालेल्या चोरीची पहिली खबर ते पोलिसांत देण्यास विसरले होते.

## घटना-तीन

मधुचे तिच्या नवऱ्यासोबत पटत नव्हते. तीला दोन मुले, एक मुलगा व मुलगी होती. घरामध्ये एकूण पाच माणसे मधु, तिचा पती, दोन मुले व तिचे सासरे रहात होती. एका रात्री मधु घरात झोपली असताना घराचे ग्रिल तोडून चोर आत घुसला व तो कपाट फोडताना मधु जागी झाली, चोराने तिचे तोंड बंद करुन गळा आवळल्याने तिचा मृत्यू झाला. चोर चोरी करुन पळून गेला. मधुच्या खोलीचा दरवाजा बंद असल्याने खिडकीतून तिच्या नवऱ्याने डोकावून पाहिले असता त्यांना मधुचे मृत शरीर दिसले, मधुचा पति व सासरा दोघेही घाबरले होते. ते विचार करत राहिले की, फिर्याद पोलिस ठाण्यात द्यावी किंवा नाही?

## घटना -चार



इदरीस गावातील एक समृध्द शेतकरी आहे. त्याने शेजारच्या गावातील एका शेतकऱ्याचे तम्बाखुचे शेत विकत घेतले व ते त्रयस्त इसमास विकले. गिऱ्हाईक व इदरीस यांच्यात देण्याघेण्यावरुन बाचाबाची झाली. गिऱ्हाईक वीस गुंडाना घेऊन आला व इदरीस यांचेवर हल्ला केला व त्या हल्ल्यात इदरीसचा मृत्यू झाला.

इदरीसची पत्नी अडाणी होती. ती पोलिस ठाण्यात जाण्यासही घाबरत होती. तीने सांगून सांगून नोकराकडून पहिली खबर लिहून घेतली. दुसरे दिवशी नोकर पहिली खबर घेउन पोलिस स्टेशनला गेला. पोलिस स्टेशन घरापासून ९ किलोमिटर अंतरावर होते. पहिली खबर नोकराने दिली. पोलिसांनी कार्यवाही केली, फौजदारी प्रकरण काही वर्षे चालले. शेवटी प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. आरोपीच्या वकिलांनी न्यायालयात म्हणने मांडले की गुन्ह्याची पहिली खबर ही जाणूनबुजून उशीरा दिलेली आहे, परंतु आरोपीना शिक्षा झाली. परंतु प्रश्न असा उभा रहातो की, पहिली खबर उशिरा दिल्याने आरोपींना त्याचा फायदा होतो का?

वर दिलेल्या घटनांमध्ये अपराध घडला आहे. चारही घटनांमध्ये पाहिले असता चारही घटनांमध्ये पहिली खबर देण्यासाठी पिडीत परिवार किंवा व्यक्ती यांच्या मनात शंका, भिती व संकोच आहेत. पोलिस ठाण्यात होणारी कायदेशीर प्रक्रियेपासुन लोक अंतर ठेवून रहातात. पोलिस ठाणे व कायदेशीर कारवाई याविषयी बाऊ केलेला आहे. परंतु पोलिस व कायदा अशा स्थितीत आपले खरे मित्र आहेत. काही वेळेला घडलेल्या गुन्ह्याची पहिली खबर दिली जात नाही असे करुन आपण गुन्हा आपले स्वत:चे माथी लादून घेतो. अशी सामान्य व्यक्तींच्या मनात पोलीस व कायद्याबाबत चुकीची धारणा होती व ती आता नष्ट होत चालली आहे.

- पोलिस जास्त मदत करत नाहीत.
- कायद्याची जाण असलेले लोक पीडितांचे शोषण करतात.
- न्याय मिळविणे हे देखील पैशावर अवलंबून आहे.
- वकिल चालबाजी करुन फसवतात.
- तपासाचे काम उशीरापर्यंत चालते.
- पुढारी व मंत्री यांचे शिफारसीमुळे केसवर प्रभाव पडतो.
- पहिली खबर देणे म्हणजे हसू किंवा खेळ नाही.

जुन्या कल्पना आता तुटून पडत आहेत. लोक आता माहितीच्या अधिकाराचा उपयोग करुन घेत आहेत. लोकाना आता समजू लागले आहे की, पहिली खबर देणे महत्वाचे आहे. असहाय्य लोकाना पहिली खबर हा मोठा आधार आहे. गुंडाच्या विरोधात जेंव्हा शेजारी–पाजारी, ओळखीचे लोक दूर जावू पहातात तेंव्हा पहिली खबर आपले रक्षण करते. पहिली खबर दिल्यानंतर पोलिसांचे कर्तव्य ठरते की, गुंडावर कार्यवाही करावी व असहाय्य लोकाना त्रास होणार नाही अशी व्यवस्था करावी.

आता पहिली खबर देणेबाबत विस्तारीत माहिती घेऊ

प्रश्न : पहिली खबर म्हणजे काय?

उत्तर : पहिली खबर म्हणजे आपण पोलिसाना दखलपात्र गुन्हा घडल्याची माहिती देणे की ज्या माहितीच्या आधारे पोलिस पुढील कारवाई सुरु करतात.

प्रश्न : जर ठाणे अंमलदाराने फिर्याद घेतली नाही तर?

उत्तर : जर ठाणे अंमलदाराने फिर्याद घेतली नाही तर, सदरची फिर्याद रजिस्टर पोष्टाने पोलिस अधिक्षक यांना पाठवता येते.



प्रश्न : पहिली खबर अन्य व्यक्तीस पाठवून दाखल करता येते का?

उत्तर : हो, असे करता येईल.

प्रश्न : जर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असेल तर त्वरित कार्यवाहीसाठी काय करता येईल?

उत्तर : पोलिस अधिक्षक/जिल्हा पोलिस अधिक्षक यांना भेटून कार्यवाहीकरिता निवेदन करता येईल.

प्रश्न : जर वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनेची दखल घेत नसतील तर काय करावे?

उत्तर :

- घटनेची सविस्तर लेखी माहिती न्यायदंडाधिकारी यांना देता येते. न्यायदंडाधिकारी हे तपासी अंमलदार यांना कारवाईचे आदेश देतील व ते स्वत:सुध्दादेखील चौकशी करु शकतील. ही कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५६(३) अनुसार केली जाते.
- अदखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्याचा अधिकार पोलिसांना नाही पण न्यायदंडाधिकारी तपास करण्याचा आदेश पोलिसाना देऊ शकतात. सामान्यपणे ही कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५५ नुसार केली जाते.
- अदखलपात्र प्रकरणामध्ये सार्वजनिक जनतेचा कोणताही हितसंबंध नसतो जसे की, बदनामी करणे, गरोदर राहिल्याने कामावरुन काढून टाकणे, कोणत्याही प्रकारची साधारण इजा करणे.
- अदखलपात्र गुन्ह्याची तक्रार न्यायदंडाधिकारी यांचेसमोर सुध्दा करता येते.

प्रश्न : अपराधाची पहिली खबर कशी लिहिली जाते?

उत्तर : पहिली खबर लिखीत अथवा मौखिक सुध्दा देता येते. मौखिक पाहिली खबर लिहून घेतल्यानंतर पोलिस खबर देणार यास वाचून दाखवतात. असे वाटले की खबर बरोबर लिहिली नसेल तर ती दुरुस्त करता येते. चुकिच्या लिहिलेल्या खबरीवर सही करु नये.

प्रश्न : पहिल्या खबरीमध्ये काय काय लिहिणे जरुरी आहे?

उत्तर : नाव, पत्ता, आरोपीचे नाव, पत्ता (माहित असेल तर) आरोपीचे वर्णन, घडलेल्या अपराधाची माहिती जसे की, अपराध कसा व कोठे झाला यासंबंधी पूर्ण माहिती लिहिणे आवश्यक आहे.

- जर गुन्हा हत्येचा असेल किंवा इजा पोहचवण्याचा असेल तर ज्या हत्याराने / वस्तुने वार (अपराध) केला त्या वस्तुचे नाव लिहिणे जरुरी आहे.
- जर अपराध चोरी, दरोडा, लूटमारीचा असेल तर चोरीस गेलेल्या वस्तु, पैसा इत्यादीचे वर्णन लिहून देणे योग्य असते.
- दखलपात्र गुन्ह्याची नोंद करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. पाहिली खबर लिहुन घेणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याने खबर लिहून घेतली नाही तर त्यास त्या विभागामार्फत शिक्षा होऊ शकते.
- पहिल्या खबरीमध्ये विशिष्ट बाबी विस्ताराने लिहिल्यास पोलिसांना कार्यवाही करणे सोईस्कर होते. दखलपात्र गुन्ह्याची पहिली खबर तात्काळ दिल्यास त्याबाबत कार्यवाही करणे पोलिसांवर बंधनकारक असते व तात्काळ कार्यवाही सुरु होते. तात्काळ कार्यवाही सुरु केल्यास चोरीस गेलेली संपत्ती परत मिळण्याची शक्यता जास्त असते व आरोपीना पकडणे सुध्दा सोपे होते.
- तक्रार दाखल केल्यानंतर तीची एक प्रत पोलिसाकडून तक्रारदाराला मिळण्याचा अधिकार आहे व पोलिसानी ती प्रत त्यास आवश्य द्यावी.
- तक्रार देतेवेळी इतर व्यक्तीस बरोबर नेणे जरुरीचे नाही. परंतु जर तक्रार देणाऱ्यास असे वाटले की ज्याच्याविरुध्द तक्रार द्यावयाची आहे तो किंवा पोलिस तुमचे सोबत वाईट वर्तन करतील अशावेळी तुम्ही तुमचे सोबत इतर व्यक्तिस घेऊन जाऊ शकता.

प्रश्न : पाहिली खबर केंव्हा द्यावी?

उत्तर : घटनेनंतर तात्काळ पहिली खबर द्यावी कारण त्यामुळे आरोपी व पुरावे मिळवणे सोईस्कर होईल.

प्रश्न : जर पहिली खबर देण्यास उशिर झाला तर काय करावे?

उत्तर : जरी पहिली खबर देण्यास उशिर झाला तरी पहिली खबर द्यावी, मात्र खबर देण्यास झालेल्या उशिराचे स्पष्ट कारण नमूद करावे.

प्रश्न : पहिली खबर देण्यासाठी पैसे लागतात का?

उत्तर : नाही, पहिली खबर देण्यासाठी खर्च लागत नाही हा सर्व खर्च सरकार करते. जर पहिली खबर देण्यासाठी पोलिस ठाण्यात कोणी पैसे मागत असेल तर त्यांची तक्रार त्यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करता येते.

प्रश्न : अपराधाची पहिली खबर कोणत्याही पोलिस ठाण्यात करता येते का?

उत्तर : अपराधाची पहिली खबर ही नजिकच्या पोलिस ठाण्यात द्यावी. जर पोलिसांना असे वाटले की गुन्हा दुसऱ्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत येतो तरी ती तक्रार नोंदवून घेऊन ती संबंधित पोलिस स्टेशनला पाठविली जाते.

आरोपींना न्यायालयात अथवा तुरुंगात पाठविण्यासाठी पाहिली खबर ही पाहिली पायरी आहे. पाहिल्या खबरीशिवाय आरोपींविरुध्द खटला चालणार नाही. पहिली खबर नसेल तर फौजदारी प्रकरण हे त्रुटीपुर्ण राहील.

पहिल्या खबरीमध्ये हा एक गुण आहे की, ती दुसऱ्या पुराव्याबरोबर मजबुत होते व जर पाहिली खबर ही इतर पुराव्यासी विसंगत असेल तर ते पुरावे कमजोर पडतात व फौजदारी प्रकरण कमजोर पडते.

प्रश्न : अजामिनपात्र गुन्हा म्हणजे काय?

उत्तर : अजामिनपात्र गुन्ह्यामध्ये पोलिस जामिन देऊ शकत नाहीत.

- जामिनपात्र गुन्ह्यामध्ये जामिन मिळणे हा आरोपीचा अधिकार आहे, परंतु अजामिनपात्र गुन्ह्यात असे नाही.
- अजामिनपात्र गुन्ह्यात जामिनाचा अर्ज न्यायदंडाधिकाऱ्यासमोर द्यावा लागतो. अपराधाचे स्वरुप पाहून न्यायदंडाधिकारी हे आपल्या सद्‌विवेकबुध्दीने जामिन द्यावा किंवा नाही याचा निर्णय घेतात.
- काही अपराध असे आहेत की ज्यामध्ये मृत्यूदंडाची शिक्षा किंवा अजन्म कारावासाची शिक्षा दिली जाते त्यामध्ये न्यायालय जामिन नाकारु शकते.

प्रश्न : दखलपात्र गुन्हा व अदखलपात्र गुन्हा म्हणजे काय?

उत्तर : दखलपात्र गुन्हा व अदखलपात्र गुन्हा याबाबतचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे:

| दखलपात्र प्रकरणे | अदखलपात्र प्रकरणे |
|---|---|
| ● दखलपात्र गुन्हा म्हणजे ज्यामध्ये पोलिस आरोपीला वॉरंटाशिवाय अटक करु शकतात अशा गुन्ह्यास दखलपात्र गुन्हा असे संबोधले जाते | ● अदखलपात्र गुन्हा म्हणजे ज्यामध्ये पोलिस आरोपीस न्यायदंडाधिकाऱ्याकडून अटक वॉरंट घेतल्याशिवाय अटक करु शकत नाही. |
| ● अशा गुन्ह्याची यादी फौजदारी प्रकिया संहितेच्या शेवटी दिलेली आहे. ज्यामध्ये वॉरंटाशिवाय आरोपीला अटक करता येते. अशा अपराधाना दखलपात्र गुन्हे असे म्हणतात. | ● अशा प्रकरणात पोलिस आरोपीस न्यायदंडाधिकारी यांचेकडून अटक वॉरंट मिळविल्यानंतरच अटक करु शकतात. |
| ● काही विशेष कायद्यात गुन्हे दखलपात्र गुन्हे संबोधले जाऊ शकते. | ● अदखलपात्र गुन्ह्यात अटक वॉरंट देण्यास न्यायदंडाधिकारी नकार देऊ शकतात. |
| ● एखाद्या व्यक्तिच्या समक्ष अन्य व्यक्ति दखलपात्र गुन्हा करत असेल तर त्या आरोपीस पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्याचा किंवा कोर्टात पाठवण्याचा अधिकार त्या व्यक्तिस आहे | |

# २. पोलिसांसंबंधीचे अधिकार

## अटक

जर पोलिसानी एखाद्या व्यक्तिस अटक केली तर पोलिसानी त्या व्यक्तिस कोणत्या गुन्ह्यात अटक केली हे सांगितले पाहिजे.



प्रश्न : पोलिस वॉरंटाशिवाय अटक करु शकतात का?

उत्तर : होय, काही गुन्ह्यासाठी बिना वॉरंट पोलिस अटक करु शकतात.

प्रश्न : अटकेच्या वेळी आपण कायद्याचे सहाय्य घेऊ शकतो का?

उत्तर : वकिलांना बोलावून अटक होणारी व्यक्ती कायद्याची मदत घेऊ शकते फक्त अट एकच की वकिलांना लवकर बोलावून घेणे.

प्रश्न : अटक करताना पोलिस जोर जबरदस्ती करु शकतात का?

उत्तर :
- अटक करते वेळी जोर जबरदस्ती करणे हे बेकायदेशीर आहे, जर अटक करावयाची व्यक्ती स्वत:हून पोलिसांच्या स्वाधीन होत असेल तर त्यास हात लावण्याचीही परवानगी नाही.
- अटक करावयाची जागा जर बंद ठिकाण वा घर असेल व अपराधी स्वत:हून पोलिसांसमोर येत नसेल किंवा लपण्याचा प्रयत्न करत असेल तर घरमालकाची जबाबदारी आहे की त्याने पोलिसांना घराची झडती घेऊ द्यावी, आरोपीस पकडू द्यावे व त्यामध्ये अडथळा निर्माण करु नये.
- अशा कोणत्याही ठिकाणी वा घराचे कुलूप तोडून, दरवाजा, खिडकी, भिंत तोडून आरोपीस पकडण्याचा पोलिसाना अधिकार आहे.

प्रश्न : महिला आरोपीस केंव्हाही अटक करता येते का?

उत्तर : महिला आरोपीस सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी अटक करता येत नाही. परंतु अटक जरुरीची असल्यास त्यासाठी न्यायदंडाधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. सामान्यत: अशी कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४६(४)च्या अधिन राहून केली जाते.

प्रश्न : अटक करताना बेड्या घालणे जरुरी आहे का?

उत्तर : अटक करताना बेड्या घालणे हे बेकायदेशीर आहे व अटक करताना बेड्या घातल्या जात नाहीत.

प्रश्न : बेड्या केंव्हा घातल्या जातात व कोणास घातल्या जातात?

उत्तर : बेड्या ह्या कुख्यात व सराईत गुन्हेगारास घातल्या जातात किंवा जे आरोपी पळून जाण्याची शक्यता असते. अशा आरोपीस न्यायदंडाधिकारी यांचेसमोर हजर करेतोपर्यंत बेड्या घातल्या जाऊ शकतात.



प्रश्न : अटकेनंतर कोणती कार्यवाही केली जाते?

उत्तर :
- अटकेनंतर पोलिसांनी तात्काळ न्यायदंडाधिकारी यांना अहवाल देणे जरुरी आहे.
- अटकेनंतर आरोपीस २४ तासांचे आत न्यायदंडाधिकारी यांचेसमोर हजर करणे आवश्यक आहे.
- अटक आरोपीस न्यायदंडाधिकारी यांचे आदेशाशिवाय २४ तासांपेक्षा जास्त काळ आरोपीस पोलिस कोठडीत ठेवणे बेकायदेशीर आहे.
- शनिवार, रविवार व सणाच्या सुट्टीच्या दिवशीही न्यायदंडाधिकारी हे न्यायालयात हजर असतात. पोलिस ठाण्यापासून ते न्यायालयाचे ठिकाणापर्यंत आरोपीस हजर करण्यासाठी जो कालावधी लागतो तो २४ तासात गणला जात नाही.
- महिला आरोपीची वैद्यकिय तपासणी ही केवळ नोंदणीकृत महिला डॉक्टरांकडूनच केली पाहिजे. ही कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ५३(२) नुसार केली जाते.

प्रश्न : अटकेची सूचना आरोपीच्या मित्रांना किंवा नातेवाईकांना कोण देते?

उत्तर :
- अटक व्यक्तिच्या अटकेची सूचना त्यांच्या मित्रांना, नातेवाईकांना किंवा अन्य व्यक्तिस पोलिसांकडून अटक केलेल्या ठिकाणाहून दिली जाते.
- अटक केलेल्या व्यक्तिस सूचना दिली जाते की तो त्याच्या अटकेची सूचना तो आपल्या परिचित व्यक्तिस देऊ शकतो किंवा त्याच्या अधिकाराचा उपयोग करु शकतो.
- आरोपीच्या अटकेची सूचना ज्या व्यक्तिस दिली त्या व्यक्तिचे नाव व पत्ता पोलिस दप्तरी नोंद केली जाते.
- आरोपीच्या अटकेची सूचना त्याचे मित्र, नातेवाईक किंवा अन्य व्यक्तिस दिली किंवा नाही याची चौकशी न्यायदंडाधिकारी करतात ही कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५० अन्वये केली जाते.

प्रश्न : अटक व्यक्तिच्या निवेदनावरुन त्याची वैद्यकिय तपासणी केली जाते का?

उत्तर :
- अटक व्यक्तिचा अधिकार आहे की, त्याची वैद्यकिय तपासणी व्हावी जेणेकरुन खटल्यामध्ये मदत होवू शकते.

- अटक व्यक्ति वैद्यकिय तपासणीबाबत आपले अधिकाराचा वापर न्यायदंडाधिकारी यांचेसमोर हजर केल्यानंतर किंवा कारागृहात (न्यायबंदी) असताना सुध्दा करु शकतो.
- न्यायदंडाधिकारी आरोपीची वैद्यकिय तपासणी नोंदणीकृत डॉक्टरांकडून करण्याचे आदेश देऊ शकतात, मात्र अधिक उशिर झाल्यास किंवा प्रकरणाच्या निकालाचे वेळी अशी वैद्यकिय तपासणीची मागणी नाकारली जाऊ शकते.

प्रश्न : आरोपीची वैद्यकीय तपासणी कोण करू शकते?

उत्तर : पोलीस उपनिरिक्षकापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या पोलिस अधिकारी यांचे निवेदनावरुन आरोपीची वैद्यकिय तपासणी नोंदणीकृत वैद्यकिय अधिकारी यांचेकडून केली जाऊ शकते, त्यासाठी तपासणीसाठी सबळ कारण हवे.


## पोलीस ठाण्यामध्ये :

- एका वस्तीतील झोपडीमध्ये चोरी झाली. पोलीस ठाण्यामध्ये त्याची पहिली खबर दिली गेली. शेजारी राहणाऱ्या भावना नावाच्या मुलीने चोरी केल्याच्या संशयावरून पोलीसांनी तिला पकडून नेले. तिला पोलीस ठाण्यातील एका छोट्या खोलीमध्ये बंद केले. घरातील व्यक्ती पोलीस ठाण्यात पोहचण्यापुर्वी पोलीसांनी तिच्यावर बलात्कार केला. घरातील व्यक्ती आल्यावर पाहिले तर ती मुलगी एका कोपऱ्यात बसून धुसमूसून रडत होती.
- वस्तीमध्ये नळाच्या पाण्यावरून दोन गटामध्ये वाद विवाद झाला. थोड्यावेळाने दोन्ही गटात किरकोळ हाणामारी झाली. एक गटाचा राजकीय दबदबा होता. त्याने पोलीस ठाण्यात जावून तक्रार दिली. पोलीसांनी चार लोकांना पकडून पोलीस ठाण्यात आणले व त्यांना बेदम मारहाण केली.
- श्यामा एका मिलमध्ये काम करीत होती. काही दिवसांपूर्वी मिलमध्ये चोरी झाली होती. व्यवस्थापकाने पोलीसांकडे त्याबाबत तक्रार दिली. संशयावरून श्यामाचे नांव घेतले होते. पोलीसांनी काही कामगारांसोबत श्यामा हीस पकडून पोलीस ठाण्यात नेले. श्यामाकडून काही कागदांवर सह्या घेतल्या. श्यामाला नंतर कळाले कि, तिच्या सह्या गुन्हा कबुलीच्या कागदांवर घेतल्या.
- शेठ इश्वरचंद यांच्या घरातून सोन्याची अंगठी चोरी झाली. त्यांनी तशी तक्रार पोलीस स्टेशनला दिली होती. पोलीसांनी विचारले की, तुमचा कोणावर संशय असल्यास त्याचे नांव लिहा. ईश्वरचंद यांनी घरचा नोकर संतराम याचे नांव लिहीले. पोलीस ठाण्यात संतराम याला बेदम मारहाण करण्यात आली. दुसऱ्या दिवशी ईश्वरचंद याने पोलीस स्टेशनला जावून अंगठी मिळाल्याचे पोलीसांना सांगितले व संतराम यास सोडून देण्यास सांगितले, परंतू ठाणे अंमलदार याने सांगितले की संतराम याने गुन्हा कबूल केला आहे.

अशा प्रकारच्या घटना वेळोवेळी वर्तमान पत्रातून वाचावयास मिळतात. सर्व साधारणपणे अशा घटना सर्वच पोलीस ठाण्यात होत नाहीत. अशा बेकायदेशीर कृत्यासाठी कायद्यामध्ये शिक्षेचे प्रयोजन आहे.



प्रश्न : पोलीस कोठडीत असलेल्या आरोपीस यातना देण्यासाठी कायदा परवानगी देतो का?



उत्तर : नाही. पोलीस अटकेत असलेल्या व्यक्तीस त्रास देणे, मारहाण करणे यासाठी कायदा परवानगी देत नाही व तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे.

प्रश्न : पोलीस जर एखाद्या व्यक्तीस अटक करून, पोलीस ठाण्यात नेत असतील तर त्याच्यासोबत घरच्या, ओळखीच्या किंवा नातेवाईक यांना बरोबर जाण्यास परवानगी आहे काय?

उत्तर : होय. अटक व्यक्तीसोबत पोलीस ठाण्यापर्यंत जाण्यास घरच्या, ओळखीच्या व्यक्ती किंवा नातेवाईक बरोबर जावू शकतात. त्यांना पोलीस अटकाव करू शकत नाही.

प्रश्न : पोलीस कोठडीमध्ये पोलीसांनी गैरप्रकार किंवा मारहाण केल्यास त्याची तक्रार कोठे व कशी केली जाते?

उत्तर : न्यायदंडाधिकारी यांचेसमोर तक्रार करता येते.

- जर एखादा पोलीस अधिकारी अटक आरोपीस त्रास देत असेल तर त्याचे नांव व वर्णन याबाबतची तक्रार देवून त्याचेविरूध्द न्यायालयात कार्यवाही केली जावू शकते.
- ताबडतोब वैद्यकीय तपासणीची मागणी केली पाहीजे. सरकारी डॉक्टर तपासणी करून अहवाल सादर करतील.



प्रश्न : महिला आरोपीस अटक करून पुरूषांच्या लॉकअप मध्ये ठेवता येईल काय?

उत्तर : महिला आरोपीस फक्त महिलांसाठी असलेल्या खोलीमध्येच ठेवता येईल.

- पोलीस कोठडीमध्ये गैरवर्तन झाल्यास न्यायदंडाधिकाऱ्यासमोर वैद्यकीय तपासणीची मागणी करता येईल व तसा तपासणीचा आदेश न्यायदंडाधिकारी देवू शकतात.
- पोलीस ठाण्यात महिला पोलीस हजर असण्याची मागणी केली पाहीजे.

प्रश्न : पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी जर एखाद्या कागदावर स्वाक्षरी करण्यास सांगत असतील तर काय करावे?

उत्तर : कागद न वाचता, न समजून घेता सही करू नये किंवा अंगठ्याचे निशाण लावू नये. जर आपण अडाणी अशिक्षीत असाल तर तो कागद दुसऱ्याकडून वाचून घ्यावा.



प्रश्न : बऱ्याचदा पोलीसांना घाबरून निरापराध व्यक्ती गुन्हा कबूल करतात तेव्हा त्यास न्याय कसा मिळेल?

उत्तर : पोलीसांसमोर गुन्हा कबूल केल्याने अपराधी ठरविले जात नाही.

फक्त न्यायदंडाधिकारी यांचेसमोर कबूल केलेला गुन्हा हाच मान्य होईल. जर पोलीस, न्यायदंडाधिकाऱ्यासमोर गुन्हा कबूल करण्यासाठी दबाव टाकत असतील तर त्यास नकार दिला पाहीजे व आपल्यावर दबाव टाकला जात आहे हि बाब न्यायदंडाधिकारी यांना सांगीतली जावी.

## महिला कैद्यांचे अधिकार

- महिला कैद्यांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी कारागृहाचे दवाखान्यामध्ये केली जाईल.
- गरोदर स्त्रियांची तपासणी व इलाज कारागृहाचे दवाखान्याचे शिफारशीनुसार शासकीय दवाखान्यात केली जाईल, तसेच त्यांचे बाळंतपणाची व्यवस्था केली जाईल. विशेष आहार व औषधे दिली जातील.
- कारागृहात प्रवेश करते वेळी महिला गरोदर नाही याची तपासणी खबरदारी म्हणून करावी व तशी तपासणी महिला डॉक्टरांकडून केली जाते.
- ही वैद्यकीय तपासणी महिला वैद्यकीय अधिकाऱ्याकडून केली जाईल.
- कारागृहात रहात असतानाचे कालावधीत जर एखादी महिला गर्भवती राहिल्यास त्याची चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत केली जाईल. जर एखादा कारागृह अधिकारी दोषी आढळल्यास त्याचेवर विभागीय चौकशीअंतर्गत कठोर कारवाई केली जाईल.
- जर एखादी बंदी महिला बलात्कार अगर जबरदस्तीची शिकार झाली असेल तर आरोपीविरूध्द तशी वर्दी दिली जावू शकते व त्यास न्यायालयामार्फत शिक्षाही होवू शकते.

## चौकशी

- कोणत्याही महिलेची चौकशी तिच्या घरी जावून केली जाते, इतरत्र नाही. महिला ही चौकशीसाठी पोलीस ठाण्यात जाण्यास नकार देवू शकते.
- १५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या अल्पवयीन मुलीस चौकशीसाठी पोलीस स्टेशनला घेवून जाता येणार नाही.
- पुरूषांना सुध्दा चौकशीसाठी लिखीत आदेशानुसारच पोलीस स्टेशनला बोलविता येईल.



- चौकशीसाठी विशिष्ठ वेळ कायद्याने ठरविलेली नाही किंवा विशिष्ठ वेळ चौकशीसाठी सांगता येणार नाही.
- आपल्याला असे वाटत असेल की पोलीस काही विशिष्ठ वेळी येवून त्रास देतात किंवा अपमानास्पद वागणूक देतात किंवा मर्यादेचे उल्लंघन करतात, तर अशा वेळी आपल्याला न्यायदंडाधिकारी यांचेसमोर चौकशीसाठी काही विशिष्ठ वेळ ठरविण्याची मागणी करता येईल.

प्रश्न : चौकशीचे वेळी आरोपी, मित्र किंवा वकील यांची मदत घेवू शकतो का?

उत्तर : होय. आपण अवश्य मदत घेवू शकता. त्यासाठी पोलीस तुम्हाला विरोध करू शकत नाही व आपणास असे वाटले की आपल्याला खोट्या आरोपाखाली गुंतविले जात आहे, तर अशा चौकशीस उत्तर देण्यास आपण विरोध करू शकता. आपण जेवढे जाणता तेवढे खरे सांगावे.

प्रश्न : चौकशीचे वेळी पोलीस अधिकारी धमकावणी देवू शकतात का?

उत्तर : नाही. पोलीसांना तुम्हाला धमकावण्याचा अथवा भिती दाखविण्याचा काही अधिकार नाही. तसेच केवळ चौकशीसाठीच तुम्हाला पोलीस कोठडीत ठेवता येणार नाही व कोणत्याही कागदावर जबरदस्तीने आपली सही अथवा अंगठा घेवू शकणार नाहीत.

<u>झडती</u>

- फक्त एक महिला ही दुसऱ्या महिलेची झडती घेवू शकते. असेच नाही तर झडती घेतेवेळी महिलेसोबत गैरवर्तन करता येत नाही.
- पुरूष पोलीस अधिकारी घर किंवा दुकानाची झडती घेवू शकतात.
- झडती घेणाराचीही झडती घेता येते.



- चोरीचे सामान किंवा बनावट दस्ताऐवज यासाठीही झडती घेता येते, परंतू कार्यवाहीविना झडती घेणे बेकायदेशिर आहे.
- न्यायदंडाधिकारी यांचे वॉरंटाशिवाय झडती घेता येणार नाही.
- झडतीचे वेळी मिळून आलेले मुद्देमालाचे वेळी स्थानिक निपक्ष, प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित असणे गरजेचे आहे.
- झडतीचे वेळेस काही वस्तू, जसे रूपये, पैसे, सोने इ. जप्त करण्यात आले तर त्यांचा पंचनामा केला जातो. त्या पंचनाम्यावर नजीक राहणाऱ्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींच्या सह्या असणे आवश्यक आहे. जे, की ते झडतीचे वेळी उपस्थित होते. पंचनाम्याची एक प्रत घरमालकास दिली जाते. ही कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ५०(अ) नुसार केली जाते.
- पोलीसांनी सांगून देखील जर घरमालक किंवा व्यवस्थापक याने ठिकाण किंवा घर

उघडत नसल्यास किंवा प्रवेश करण्यास मज्जाव करत असेल तर पोलीस चौकशी व निरीक्षणाकरीता सावधानतेने खिडकी किंवा दरवाजा तोडून प्रवेश करू शकतात.

- पोलीस झडतीच्या कार्यवाहीचे रेकॉर्ड ठेवले जाते.
- अटक करते वेळी किंवा वारंटाचे बजावणी करतेवेळी पोलीस किंवा वारंट बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यास अशा ठिकाणी किंवा घरात बंद करून ठेवल्यास त्याला बाहेरून कुलूप तोडुन किंवा तोडफोड करून बाहेर येण्याचा अधिकार आहे.
- जर झडतीचे ठिकाणी एखादी स्त्री पडद्याआड असेल तर तिला बाहेर येण्यास सांगणे जरुरी आहे. त्यानंतरच तिच्या झडतीची कार्यवाही करता येईल.
- शक्य त्या वेळी झडतीसाठी महिला पोलीसाची मदत घ्यावी लागते.

# ३. न्यायालयात खटल्याची सुनावणी

प्रश्न : सुनावणीच्या वेळी वकीलांची मदत घेतली जावू शकते का?

उत्तर : होय. वकीलांची मदत तात्काळ घेतली जावू शकते.

प्रश्न : गरिब व असहाय व्यक्तीस न्याय कसा मिळेल?

उत्तर : अशा व्यक्तीस मोफत कायदेशिर मदत देण्याची व्यवस्था होवू शकते. त्यास विधी सेवा मिळू शकते. यामध्ये न्यायालयाद्वारे वकील नियुक्त केला जावू शकतो. न्यायालय व वकीलाचा कोणताही खर्च द्यावा लागत नाही. खटला सरकारी खर्चाने चालविला जातो.

प्रश्न : न्यायालयात सुनावणीचे वेळी कोणती पध्दत अवलंबिली जाते?

उत्तर : कोर्टाची सुनावणीची प्रक्रीया खालीलप्रमाणे असते.

- सर्व प्रथम पोलीसांद्वारे आरोपपत्र दाखल केले जाते.
- आरोपाची निश्चिती करून खटला चालविला जातो.
- अपराधाविषयी पुरावे सादर केले जातात.
- आरोपी आपल्या बचावासाठी पुरावा व चिजवस्तू सादर करतो.
- वरिलप्रमाणे खटला चालतो व कोर्ट आपला निर्णय देते.
- आरोप, साक्ष, पुरावे, सुनावणी आणि वकीलांचा युक्तीवाद इत्यादी गोष्टी ऐकल्यानंतर न्यायदंडाधिकारी यांस असे वाटले की आरोप सिध्द झाला आहे, तर आरोपीस कायद्याच्या कलमाअनुसार दंड वा कारावास किंवा दोन्ही शिक्षा दिल्या जातात. जर न्यायदंडाधिकाऱ्यास असे वाटले की, आरोपी निरपराध आहे, तर त्यास निरापराधी घोषित करण्यात येते.



# ४. जामीन

प्रश्न : जामीन म्हणजे काय?

उत्तर : कोणत्या अपराधाची कार्यवाही किंवा सुनावणीचे दरम्यान अटक केलेल्या आरोपीस अटींवर सोडता येते. त्यास जामीन असे म्हणतात. जामीनाची जबाबदारी स्वत: त्या व्यक्तीस अन्यथा अन्य व्यक्तीस घ्यावी लागते.

प्रश्न : जामीनपात्र गुन्हे व अजामीनपात्र गुन्हे म्हणजे काय?

उत्तर : जसे की शब्दातच म्हटल्याप्रमाणे हे स्पष्ट आहे की काही गुन्हे जामीनपात्र व काही गुन्हे अजामीनपात्र आहेत. जामीनपात्र गुन्ह्यामध्ये आरोपीस जामीनावर सोडण्याचा अधिकार असतो. परंतू अजामीनपात्र गुन्ह्यामध्ये न्यायदंडाधिकारी यांचा आदेश मिळाल्यानंतरच आरोपीस जामीनावर सोडता येते. अटक करतेवेळी पोलीसांनी आरोपीस सांगणे जरूरीचे आहे की, पोलीस जामीनावर सोडू शकतात की जामीनावर सोडण्यास न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशाची गरज आहे. जर पोलीसांनी अशी कल्पना दिली नाही तर आपण त्यांना विचारू शकता, ज्या गुन्ह्यात अटक केली आहे तो गुन्हा जामीनपात्र आहे की अजामीनपात्र आहे.

| जामीनपात्र गुन्हा | अजामीनपात्र गुन्हा |
|---|---|
| • जामीनावर सोडण्याचा अधिकार आहे. | • न्यायदंडाधिकारीचे आदेश मिळाल्या नंतर जामीनावर सोडता येईल. |
| • जामीनपात्र गुन्ह्यात पोलीस अपराधीस जामीनावर सोडू शकतो. | • अजामीनपात्र गुन्ह्यात अपराधीस पोलीस जामीनावर सोडू शकत नाही. |
| • जामीनपात्र गुन्ह्यात जामीन मिळणे हा आरोपीचा अधिकार आहे. | • ज्या अपराधासाठी मृत्युदंड अथवा आजीवन कारावासाची शिक्षा आहे त्या अपराधामध्ये जामीन नाकारला जातो |
| | • अजामीनपात्र गुन्ह्यामध्ये जामीन मिळणे हे न्यायदंडाधिकाऱ्याचे विवेकावर अवलंबून आहे.<br>• काही अपराधामध्ये न्यायदंडाधिकारी सुध्दा जामीन देत नाहीत. |

प्रश्न : कोणते गुन्हे जामीनपात्र व अजामीनपात्र आहेत?

उत्तर : याबाबतची सुची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये व इतर कायद्यामध्ये नमूद केलेली आहे.

प्रश्न : जामीन कसा होतो?

उत्तर : जो गुन्हा जामीनपात्र आहे त्यामध्ये आरोपीला जामीन मिळण्याचा अधिकार आहे. जामीन मिळण्यासाठी जामीन पत्रावर आरोपीने सही करणे आवश्यक आहे व या सोबत अन्य व्यक्तीचा जामीन द्यावा लागतो. काही गुन्ह्यात पोलीसांकडे जामीन द्यावा लागतो.

प्रश्न : जामीन रद्द होवू शकतो का?

उत्तर : होय, जामीनावर सुटल्यानंतर जर आरोपीने साक्षीदारांना भिती दाखविली, धमकाविले, फितविले किंवा पुराव्यामध्ये ढवळाढवळ केली तर जामीन रद्द होवू शकतो. लक्षात ठेवा, जामीनावर सुटणे म्हणजे निर्दोश मुक्तता नव्हे.

प्रश्न : जामीन अर्जात काय काय लिहावे लागते?

उत्तर :

- नांव व अटकेची तारीख
- कोणत्या गुन्ह्यात अटक झाली
- पत्ता व किती वर्षापासून रहात आहे व कुटूंबाची सविस्तर माहिती
- घर स्वत:चे आहे की वडीलांचे किंवा भाड्याने आहे का?
- घर भाड्याने असेल तर घरमालकाची सविस्तर माहिती
- कोठे काम करतो व किती वर्षापासून करतो
- यापुर्वी कधी अटक झाली होती का? (खरे असेल तर लिहा)
- आपण गुन्हा केलेला नाही (हे खरे असेल तर तसे लिहा).
- माझी अशी विनंती की, मला जामीनावर सोडण्यात यावे.
- आपल्या विषयी काही माहिती द्यावयाची असल्यास देवू शकता जसे, मी, ........ .., ठिकाण/समुदायचा रहाणारा आहे. ........ समुदाय/ठिकाणचे लोक मला ओळखतात, त्यामुळे माझी पळून जाण्याची शक्यता नाही.

प्रश्न : जामीनाचा अर्ज कोणास द्यावा लागतो?

उत्तर : अटक झाल्यानंतर पहिल्याच दिवशी न्यायदंडाधिकारी यांचेसमोर साध्या कागदावर अर्ज लिहून द्यावा लागतो.

प्रश्न : अटकपुर्व जामीन म्हणजे काय?

उत्तर : जेव्हा एखाद्या व्यक्तीस शंका येते की त्याला अजामीनपात्र गुन्ह्यात अटक होण्याची शक्यता आहे. अशा वेळी उच्च न्यायालय / सत्र न्यायालयात अटकपुर्व जामीनासाठी अर्ज करून अटकपुर्व जामीन घेता येईल व अटकेच्या वेळेस तावडतोब जामीनवर सोडले जावू शकते.

प्रश्न : अटकपुर्व जामीनाचा अर्ज कोठे द्यावयाचा असतो?

उत्तर : अटकपुर्व जामीनाचा अर्ज सत्र न्यायालय वा उच्च न्यायालय येथे द्यावयाचा असतो.

प्रश्न : यासाठी कोणत्या अटी व शर्ती आहेत?

उत्तर :
- पोलीस चौकशीसाठी जेव्हा बोलवतील तेव्हा जाणे.
- साक्षीदार यांना घाबरविणे किंवा धमकाविणे यापासुन दूर रहाणे.
- न्यायालयाचे परवानगीशिवाय देश सोडून न जाणे वगैरे.
- अटकपुर्व जामीन झाल्यानंतर न्यायदंडाधिकारी जामीनपात्र वारंट काढू शकतो. न्यायालयात हजर झाल्यानंतर शर्तीनुसार जामीन व द्रव्यदंड द्यावा लागतो.



# ५. जामीनपात्र गुन्हे व रिमांड

प्रश्न : जामीनपात्र गुन्ह्याचा जामीन कोठे होतो?

उत्तर :
- जामीनपात्र गुन्ह्यामध्ये पोलीस आरोपीकडुन जामीन घेवून जामीनावर सोडू शकतात. यासाठी आरोपीचा नातेवाईक किंवा ओळखीचा इसम आरोपीस सोडण्याची जबाबदारी स्विकारून जामीन राहू शकतो. जामीनाची रक्कम फार मोठी नसते व आरोपीस काही रकमेच्या जामीनावरही सोडले जावू शकते.
- पोलिस किंवा कोर्ट आरोपीस वैयक्तिक द्रव्यदंडावर तसेच एक किंवा त्यापेक्षा अधिक जामीन देण्याचा आदेश करू शकते. जामीन देणारी व्यक्ती गुन्हेगार असता कामा नये व ती व्यक्ती जामीनाची रक्कम भरण्याएवढी ऐपतदार असली पाहीजे. अशा जामीनपत्रास सुरक्षा बॉन्ड किंवा प्रतिभुती पत्र असे म्हणतात व जामीन देणारास जामीनदार असे म्हणतात.
- जामीनावर सुटलेल्या व्यक्तिने जर जामीनाच्या अटींचा भंग केला तर त्याची व जामीनदाराची जामीनाची रक्कम जप्त केली जावू शकते व ती रक्कम सरकार जमा केली जाते.



प्रश्न : जामीनासाठी वकिलांची आवश्यकता आहे का?

उत्तर : जामीनपात्र गुन्ह्यासाठी वकिलांची आवश्यकता नाही. जामिनासाठी पोलिस एक अर्ज देतात तो भरुन द्यावयाचा असतो.

प्रश्न : जामीनासाठीचा अर्ज भरल्यानंतर जामीन मिळतो का?

उत्तर : जामीनासाठीचा अर्ज भरल्यानंतर एक किंवा दोन व्यक्ति साक्षीदार म्हणुन लागनात. जामीनपत्रात जरूर पडेल त्या वेळेस आरोपीस पोलीस स्टेशन किंवा कोर्टात हजर ठेवण्याची जबाबदारी जामीनदार याने स्विकारलेली असते.

प्रश्न : जामिनासाठी रोख रक्कम भरावी लागते का?

उत्तर : जामीनाचे वेळेस रोख रक्कम भरावी लागत नाही पण आरोपी हा कोर्टात हजर न राहिल्यास जामीनपत्रात नमुद केलेली जामीनाची रक्कम भरावी लागते.

| जामीनपत्र | |
|---|---|
| आपले नाव | आपला पत्ता |
| पोलिस ठाणे किंवा कोर्टाचे नाव | जामिनाची रक्कम |
| जामिनाच्या अटी | |
| (उदा. ज्या दिवशी बोलावतील त्यावेळी आरोपी हा कोर्टात किंवा पोलिस स्टेशनला हजर होण्यास बांधील आहे.) | |

त्यामध्ये असेही लिहिलेले असते की, आरोपीने जर जामिनाच्या अटींचे उल्लंघन केले तरी त्याची जामिनाची रक्कम सरकार जमा केली जाईल.

जामिनाच्या अटींचे जर आरोपीने उल्लंघन केले तर त्याच्या जामिनदारास नोटीस पाठविली जाईल की त्याने जामिनाची रक्कम कोर्टात जमा करावी. जर जामिनदाराने जामिनाची रक्कम जमा केली नाही तर जामिनदार याची मालमत्ता जप्त करण्याचे वॉरंट काढले जाईल.

प्रश्न : जामीन योग्य आरोपी कोण कोण असतात?

उत्तर : जर पकडलेली व्यक्ति

- सोळा वर्षापेक्षा कमी वयाची असेल, महिला, किंवा आजारी किंवा अशक्त व्यक्ती अशा व्यक्ती जामिन मिळण्यास पात्र असतात.
- जर कोर्टाला असे वाटले की पकडलेल्या व्यक्तीच्या विरुध्द मृत्यूदंड किंवा अजीवन कारावासाची शिक्षा असलेला खटला दिसत नसेल तर ते अशा आरोपीला काही अटीवर व जामीनावर सोडू शकते.
- पकडलेली व्यक्ती वैयक्तिक जात द्रव्यदंड किंवा ऐपतदार व्यक्ती जामिनदार म्हणून देणे आवश्यक असते व तो तसा जामिन देत असेल तर त्या व्यक्तिस जामिनावर सोडले जाऊ शकते. अन्यथा असा खटला आरोपीला कारागृहात ठेवूनच चालवावा लागतो.
- जर आरोपी हा न्यायालयीन कोठडीत असेल व त्याचा कारागृहातील कालावधी हा त्याचे विरुध्द असलेल्या गुन्ह्यातील शिक्षेचा अर्धा कालावधी झाला असेल तर त्यास वैयक्तिक जात मुचलक्यावर सोडणे जरुरी आहे.

● परंतु उपरोक्त सुविधा ही मृत्यूदंड अथवा अजीवन कारावासाच्या अपराधासाठी नाही.

## रिमांड

जेव्हा अटक आरोपीस न्यायदंडाधिकारी यांचेसमोर हजर केले जाते तेव्हा तीन प्रकारे न्यायालय कार्यवाही करते.

१ आरोपीस जामीनावर सोडू शकते

२ पोलीस कोठडी देवू शकते

३ न्यायालयीन कोठडीत घेवू शकते

प्रश्न : पोलीस कोठडीची कार्यवाही म्हणजे काय व ती कशी होते?

उत्तर : आरोपीस न्यायालयात हजर केल्यानंतर पोलीस पुढील चौकशीसाठी आरोपीची पोलीस कोठडीची मागणी करतात. न्यायालयाचे लिखीत आदेशानंतर आरोपीस पुन्हा पोलीस कोठडीत ठेवले जाते.

प्रश्न : आरोपीस पोलीस कोठडीत किती दिवस ठेवू शकतात?

उत्तर : कोणत्याही आरोपीस पोलीस कोठडीत १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी ठेवता येत नाही.

प्रश्न : असे म्हणतात की, पोलीस कोठडीत आरोपीचा छळ केला जातो.

उत्तर : पोलीस कोठडीत आरोपी व्यक्तीस मारहाण व छळ करणे बेकायदेशिर आहे. जर मारहाण व छळ झाल्यास त्याची तक्रार न्यायदंडाधिकारी समोर हजर केल्यानंतर केली जावू शकते.

प्रश्न : न्यायालयीन कोठडी म्हणजे काय?

उत्तर : न्यायालयीन कोठडीस ज्युडिशिअल कस्टडी असेही म्हणतात. न्यायालयीन कोठडी म्हणजे आरोपीस कोर्टाचे संरक्षणात कारागृहात ठेवले जाते व कोर्टात कार्यवाहीच्या वेळी त्यास न्यायालयामध्ये हजर केले जाते.

प्रश्न : न्यायालयीन कोठडी किती दिवसाची असते?

उत्तर : न्यायालयीन कोठडी एका वेळी १५ दिवसांची असते.

● जर न्यायालयीन कोठडीची मुदत वाढवायची असेल तर आरोपीस न्यायालयासमोर हजर केले पाहीजे व तसा आदेश घेतला पाहीजे.

● आरोपीस केवळ न्यायालयीन कारागृहापर्यंत आणून चालणार नाही तर त्यास प्रत्यक्षात न्यायालयासमोर हजर केले पाहीजे.

● न्यायालयासमोर हजर न करता न्यायालयीन कोठडीची मुदत वाढविणे हे बेकायदेशिर आहे.

राजू यास बलात्काराचे आरोपाखाली अटक करून न्यायदंडाधिकरीसमोर हजर करण्यात आले. न्यायदंडाधिकारी यांनी त्यास पोलीस कोठडीत पाठविले.

महेश यास खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली त्यालासुध्दा न्यायदंडाधिकरींसमोर हजर करण्यात आले. न्यायदंडाधिकारी यांनी त्यास न्यायालयीन कोठडीत पाठविले.

या दोन्ही घटना अजामीनपात्र गुन्ह्यातील आहेत. परंतु राजू यास पोलीस कोठडीत पाठविले व महेश यास न्यायालयीन कोठडीत पाठविले?



प्रश्न : पोलीस कोठडी व न्यायालयीन कोठडी यात फरत काय?

उत्तर :
- वरील दोन्ही घटनांमध्ये महेश आणि राजू यांचे अपराध हे अजामीनपात्र आहेत. अटक आरोपीस पोलीस २४ तासांचे आत न्यायालयासमोर हजर करतात.
- जर न्यायदंडाधिकरी यांनी जामीन नाकारला तर आरोपीस पोलीस कोठडीत किंवा न्यायालयीन कोठडीत पाठविले जाते.
- सामान्यपणे पोलीस आरोपीची पोलीस कोठडीची मागणी करतात कारण चौकशी करून गुन्ह्याच्या तपासात मदत होवू शकेल. पोलीस कोठडीत आरोपी हा लॉकअपमध्ये असतो.
- न्यायालयीन कोठडीत आरोपी हा कारागृहात असतो. न्यायदंडाधिकारी यांचे परवानगीशिवाय पोलीस न्यायालयीन कोठडीतील आरोपीकडे चौकशी करू शकत नाही.
- कोठडीचा कालावधी हा १५ दिवसांपेक्षा जास्त असू शकत नाही.

प्रश्न : आरोपीस खटल्याची सुनावणी व निर्णय होईपर्यंत कारागृहातच रहावे लागते का?

उत्तर : जर आरोपीचा जामीन झाला नाही तर त्यास कारागृहातच रहावे लागते.

प्रश्न : आरोपी जामीनाचा अर्ज केव्हाही करू शकतो का?

उत्तर : आरोपी वारंवार जामीनासाठी अर्ज करू शकतो. कायद्यात अशी तरतूद आहे की, जर अपराधाची चौकशी निर्धारित वेळेमध्ये पूर्ण झाली नाही तर आरोपीस जामीनावर सुटण्याचा अधिकार आहे.

प्रश्न : तपासाचा कालावधी किती असतो?

उत्तर : ज्या अपराधामध्ये मृत्युची शिक्षा किंवा आजिवन कारावासाची शिक्षा किंवा कमीत कमी १० वर्षे शिक्षा आहे अशा अपराधामध्ये तपासाचा कालावधी ९० दिवस आहे. जर असा तपास ९० दिवसात पुर्ण झाला नाही तर आरोपीस जामीन मिळण्याचा अधिकार आहे. इतर अपराधामध्ये तपासाचा कालावधी ६० दिवस आहे, तो उलटल्यास आरोपीस जामीन मिळण्याचा अधिकार आहे.

# ६. तडजोड योग्य अपराध व तडजोडीची प्रकरणे

फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार अपराधाचे तीन प्रकार आहेत.

- तडजोड योग्य
- न्यायालयाचे पुर्वपरवानगीने तडजोड योग्य
- तडजोड अयोग्य

प्रथमवर्ग तडजोडयोग्य अपराध :—

- कोणाच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील अशा प्रकारे केलेले कथन
- साधारण स्वरूपाची इजा पोहचविणे.
- अनधिकृतपणे एखाद्यास थांबवून ठेवणे किंवा बंद करून ठेवणे
- एखाद्यास मारहाण करण्यासाठी बळाचा उपयोग करणे
- एखाद्या व्यक्तीचे वैयक्तीक नुकसान होण्यासाठी मस्करी करणे
- अपराध करण्याच्या इराद्याने केलेले अतिक्रमण
- एखाद्याचे घरात वाईट इराद्याने प्रवेश करणे वा राहणे
- व्यभिचार
- विवाहितेस पळवून नेणे किंवा वाईट इराद्याने रोखून ठेवणे
- मानहानी
- जानूनबुजून अपमानजनक मजकूर छापणे, लिहीणे किंवा विकणे
- शांतताभंग करण्यासाठी किंवा उचकविणेचे इराद्याने अपमान करणे
- अपराध करण्याची धमकी देणे
- दैवी शक्तीचा प्रकोप होईल अशी भिती दाखवून काम करून घेणे

दुसरा वर्ग — न्यायालयाचे पुर्व परवानगीने तडजोडयोग्य प्रकरणे :—

- यामध्ये न्यायालयात ज्या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे, त्या प्रकरणातील आरोपी व फिर्यादी न्यायालयाचे परवानगीने तडजोडीची मागणी करू शकते. त्यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आहे.
- एखाद्या घातक हत्याराने किंवा वस्तुने जखमी करणे,
- जणुनबूजून गंभीर दुखापत करणे
- अपराधाची धमकी देणे
- दैवी शक्तीचा प्रकोप होईल अशी भिती दाखवुन काम करून घेणे

दुसरा वर्ग — न्यायालयाचे पुर्व परवानगीने तडजोडयोग्य प्रकरणे. :—

- यामध्ये न्यायालयात ज्या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे, त्या प्रकरणातील आरोपी व फिर्यादी न्यायालयाचे परवानगीने तडजोडीची मागणी करू शकते. त्यामध्ये वेगवेगळया

प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आहे.

- एखाद्या घातक हत्याराने किंवा वस्तुने जखमी करणे,
- जणुनबूजून गंभीर दुखापत करणे
- कोणाच्यातरी भडकावण्यावरून अचानक एखाद्यास गंभीर दुखापत करणे.
- संताप किंवा बेपर्वाइने एखाद्यास गंभीर स्वरूपाची जखम करणे किंवा त्यास प्राण संकटात टाकणे
- तीन किंवा जास्त दिवस एखाद्यास बंद ठेवणे
- एखाद्यास गुप्त ठिकाणी बंद ठेवणे
- एखाद्या स्त्रिस विनयभंग करण्याचे इराद्याने बळाचा वापर करणे
- एखाद्यास कैद करण्याच्या इराद्याने मारहाण किंवा बळाचा वापर करणे
- रूपये २५० पर्यंत किंमत असलेल्या वस्तुची चोरी
- एखाद्याची संपत्ती वाईट इराद्याने ठेवून घेणे किंवा उपयोगात आणणे
- रूपये २५० पर्यंत किंमत असलेली संपत्ती भाड्याने देवून विश्वासघाताने हडप करणे
- आपल्या मालकाच्या रूपये २५० पर्यंत किमतीची वस्तू नोकराद्वारे विश्वासघाताने हडप करणे.
- रूपये २५० पर्यंत किंमत असलेल्या चोरीची वस्तु बेइमानाने खरेदी करणे
- अशी किंमत असलेल्या चोरीची वस्तु इकडे तिकडे लपविणेस मदत करणे
- धोका देणे
- संरक्षणाच्या संदर्भातील संपत्तीबाबत धोका देणे
- दुसऱ्याचे रुप धारण करुन धोका देणे
- धोका देवून मौल्यवान संपत्ती देण्यास एखाद्यास विवश करणे किंवा दस्तऐवजामध्ये काट छाट करणे किंवा नष्ट करणे
- सावकाराची संपत्ती मिळविण्यासाठी बाधा निर्माण करण्यासाठी कपटपूर्वक संपत्ती लपविणे किंवा हटविणे.
- कपटपूर्व संपत्तीच्या खरेदी विक्री संबंधी चूकीचे कथन करणे
- कपटाने संपत्ती काढणे किंवा लपवून ठेवणे
- १० रुपयापेक्षा जास्त किंमतीच्या जनावराची हत्या करणे किंवा त्याचा अवयव तोडणे
- एखाद्याच्या शेती सिंचनाच्या पाण्याचा प्रवाह त्रास व नुकसान देण्याच्या हेतुन बदलणे
- चोरीच्या इराद्याने घरात घुसून इतर अपराध करण्याचा प्रयत्न करणे
- खोटे व्यापारी चिन्ह किंवा संपत्तीचा वापर करणे
- एखाद्याच्या व्यापारी किंवा संपत्ती चिन्हाची नक्कल करणे
- खोट्या व नकल केलेल्या व्यापारी वा संपत्ती चिन्हाची वस्तू जाणिवपुर्वक विकणे किंवा बाळगणे
- पती किंवा पत्नी जिवंत असताना दुसरा विवाह करणे

- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा राज्यपाल किंवा केंद्र शासित प्रदेशाचे प्रशासक यांचे विरुध्द लोक कर्तव्य पालनाच्या संदर्भात मानहानी करणे.
- एखाद्या स्त्रीकडे पाहून वाईट इशारे करणे वा शब्द उच्चारणे किंवा वस्तू दाखवून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन किंवा स्त्रीच्या वैयक्तिक जीवनावर संकट येईल असे वर्तन करणे.

तीसरा वर्ग

तीसऱ्या वर्गामध्ये वर उल्लेख केलेल्या अपराधाच्या व्यतिरिक्त इतर अपराध आहेत जे तडजोड योग्य नसतात, ज्यामध्ये न्यायालय खटला चालवून शिक्षा देते किंवा अपराध सिध्द न झाल्यास आरोपीस सोडून देते.

प्रश्न : तडजोड कोण करु शकते?

उत्तर : ज्याच्यांवर गुन्हा झाला आहे ती व्यक्ती

- अशी व्यक्ति जर अठरा वर्षापेक्षा कमी वयाची असेल किंवा वेडी असेल किंवा असमंजस असेल तर त्याच्या वतीने त्याचे पालक ही तडजोड करु शकतात.
- जर फिर्यादी मयत झाला तर त्याचा कायदेशीर वारस तडजोड करु शकतो.
- न्यायालयाच्या अनुमतीने दुसरी व्यक्ति तडजोड करु शकते.
- परंतु अशा व्यक्तिस पुर्वी शिक्षा झाली असेल त्यासाठी दुसऱ्या अपराधात जास्तीचा दंड द्यावयाचा आहे अशी व्यक्ती तडजोड करु शकत नाही.

तडजोडीची कायदेशीर प्रक्रिया

- तडजोड स्विकारल्यानंतर आरोपीस त्या आरोपातून मुक्त केले जाईल, जी तडजोड त्यांनी फिर्यादी बरोबर केली.
- कायद्यामध्ये यापेक्षा वेगळया पध्दतीने तडजोडीची प्रक्रिया नाही.

## एक महत्वपूर्ण न्यायनिर्णय

### डी के बासु विरुध्द पश्चिम बंगाल राज्य १९९७

यातील निर्देश असे आहेत.

चौकशी व अटकेच्या वेळी

- सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी एक पट्टी लावावी ज्यावर त्याचे नांव व पदनाम स्पष्ट लिहिलेले असेल.
- जे पोलीस अधिकारी चौकशीमध्ये सामील असतील त्यांचे पुर्ण वर्णन नोंदवहीमध्ये नोंद असावी.

अटक पंचनामा (अॅरेस्ट मेमो)

अटक करते वेळी पोलीस अटकेचा पंचनामा करतील.

- या पंचनाम्यामध्ये कमीत कमी एका साक्षीदाराची स्वाक्षरी असेल.
- हा साक्षीदार कुटूंबाचा सदस्य असेल किंवा स्थानिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती असेल.

- अटक पंचनाम्यावर अटक व्यक्तीची सही असेल.
- अटक पंचनाम्यावर अटकेची तारीख व वेळ लिहीलेली असेल.

निरिक्षण यादी (इन्स्पेक्शेन लिस्ट)

- अटक व्यक्तीच्या अंगावर साधारण किंवा गंभीर स्वरूपाच्या जखमा आहेत का?
- जर अशा स्वरूपाच्या जखमा अथवा खुणा असतील तर त्याचा उल्लेख पंचनाम्यामध्ये करावा.
- निरीक्षण यादीची एक प्रत अटक व्यक्तीस दिली जाते
- आरोपी व्यक्तीस त्याच्या अटकेची सुचना इतरांना देण्याची सवलत आहे.
- अटक व्यक्तीस हा अधिकार आहे की तो त्याच्या अटकेची सुचना व त्याला कोठे ठेवले आहे याची सुचना त्याचे परिचित व्यक्तीस किंवा नातेवाईकांस देवू शकतो.
- जर अटक आरोपीचे नातेवाईक किंवा परिचीत दुसऱ्या शहरात रहात असतील तर त्यांना अटकेची सुचना टपालयंत्रणेद्वारे ८ ते १२ तासांच्या आत द्यावी.

ही सुचना जिल्ह्याच्या कायदे सल्ला केंद्रातूनही दिली जावू शकते.

पोलीस ठाण्यातील नोंदवही (स्टेशन डायरी)

- अटकेचे कारण पोलीस ठाण्यातील नोंदवहीमध्ये नोंदविले पाहीजे.
- आरोपीचे अटकेची सुचना त्याचे कोणत्या नातेवाईकास किंवा ओळखीच्या व्यक्तीस दिली त्याचे नांव व पत्ता याची नोंद नोंदवहीत घेतली पाहिजे.
- पोलीस ठाण्यातील नोंदवहीत आरोपीस कोणत्या पोलीस अधिकाऱ्याचे ताब्यात ठेवले याची नोंद केली पाहीजे.

# ७. आरोपीची वैद्यकीय तपासणी

- अटक आरोपीची वैद्यकीय तपासणी प्रशिक्षीत डॉक्टरांकडून दर ४८ तासानंतर करावी.
- आरोपीची वैद्यकीय तपासणी करणारा अधिकारी हा राज्य शासनाच्या नियुक्त केलेल्या पॅनेलवरील असावा.
- आरोग्य संचालकांची ही जबाबदारी आहे की, सर्व जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी आशा प्रकारची पॅनेल तयार करावीत.

कायदेशीर मदतीचा अधिकार :–

- अटक व्यक्तिस चौकशीचे वेळी आपले वकिलांना भेटण्याची परवानगी असावी.

क्षेत्रिय न्यायदंडाधिकारी :–

- क्षेत्रिय न्यायदंडाधिकाऱ्यांना आरोपीच्या अटकेसंबंधी सर्व कागदपत्रे पाठविणे आवश्यक आहे.
- त्यामध्ये अटकेचा पंचनामा आवश्यक आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष :–

- सर्व जिल्हा व राज्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी पोलीस नियंत्रण कक्ष असणे आवश्यक आहे.
- अटक केलेल्या आरोपीला ठेवलेल्या ठिकाणाची सूचना पोलीस नियंत्रण कक्षाला १२ तासाच्या आत देण्यात यावी.
- ही माहिती पोलीस नियंत्रण कक्षाच्या सूचना फलकावर स्पष्ट अक्षरांमध्ये लावली जावी जेणेकरुन ती सर्वांना वाचता येईल.

# ८. मानवी अधिकार आयोग

मानवी अधिकार आयोग एक असा आयोग आहे की, ज्यामध्ये मनुष्याच्या मूळ अधिकारांचे रक्षण केले जाते. जर असे आढळले की, पोलीसांच्या अधिकारबाह्य कृतीमुळे मनुष्याच्या मुळ हक्कांची पायमल्ली झाली असेल तर अशा अपराधाचा समावेश या संज्ञेत येतो. अशा घटनांची तक्रार ही मानवी हक्क आयोगाकडे केली जाते व अशा तक्रारीवर मानवी हक्क आयोग न्यायोचित निर्णय घेते.

प्रश्न : आरोपी ताब्यात असतांना किंवा जेलमध्ये असतांना त्याचा मृत्यु झाल्यास मानवी आयोगाचे काय निर्देश आहेत?

उत्तर : घटना घडल्याची सुचना २४ तासाच्या आत मानवी आयोगाला कळविली पाहिजे.

प्रश्न : जर अशा मृत्युची सूचना मानवी आयोगास न कळविल्यास?

उत्तर : असे समजण्यात येईल की, संबंधीत अधिकारी झालेल्या मृत्युच्या कारणांना लपवित आहेत.

प्रश्न : मृत्युची सूचना तात्काळ दिल्यानंतर ती सुनिश्चित करण्यासाठी आयोगाचे काय निर्देश आहेत?

उत्तर : आयोगाने राज्यांना असे निर्देशित केले आहे की, शवविच्छेदनाची दृश्य चित्रफीत तयार करुन ती आयोगासमोर सादर करावी.

- आयोगाने असेही निर्देश दिले आहेत की, प्रत्येक राज्याच्या पोलीस मुख्यालयामध्ये मानवी अधिकार कक्ष बनविण्यात यावा.
- आयोगाने अशाही सुचना दिलेल्या आहेत की, घटनेची माहिती कळविणाऱ्या व्यक्तीस त्याचा नाव व पत्ता जबरदस्तीने विचारु नये.
- आरोपी अटकेत असताना आरोपीस मारहाण किंवा त्याचा मृत्यु झाल्यास संबंधीत घटनेबाबत राज्याच्या उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करता येते.
- अटकेत असलेल्या आरोपीस मारहाण झाल्यास त्यास नुकसान भरपाई देता येईल.

जर आपल्याला असे वाटत असेल की, मानवी अधिकारांची पायमल्ली करून पोलीस अत्याचार करीत असतील तर खालील पत्त्यांवर तक्रार करता येईल.

राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, फरीदकोट हाउस,
कोपरनिकस मार्ग, नवी दिल्ली

आपण आपली तक्रार राज्याच्या मानव अधिकार आयोगाच्या कार्यालयातही करु शकतो.

न्याय सब के लिए

ACCESS TO JUSTICE FOR ALL

दुर्बल घटक वा असो उत्पन्न कमी ।
प्राधिकरण देते विधी सेवेची हमी ।।

विधी सेवा प्राधिकरण योजना जिथे जिथे ।
अन्यायास वाचा फुटेल तिथे तिथे ।।

समजुन घ्या लोकन्यायालयाचे मोल ।
साधते ते जीवनात समतोल ।।

साधता संवाद ।
संपतो वाद ।।

भांडणापेक्षा समझोता बरा ।
मिळेल त्यातच आनंद खरा ।।


# महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ♦ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६९५८९६ / (०२२) २२६९१३५८ ♦ फॅक्स : (०२२) २२६५४९९५